दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१६३ | बुधवार दि.०२ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### विरोधी पक्ष नेते राहुल गांधी आज नाशिक दौऱ्यावर

दिल्ली : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज बुधवार २ सप्टेंबर रोजी एक दिवसाच्या नाशिक दौऱ्यावर येत आहेत. नाशिक येथील रिसॉर्टमध्ये संगठन सृजन अभियानाअंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या जिल्हा काँग्रेस कमिट्यांच्या अध्यक्षांचे निवासी प्रशिक्षण शिबिर २४ ऑगस्ट पासून सुरु आहे. बुधवार २ सप्टेंबर रोजी राहुल गांधी यांच्या उपस्थितीत या शिबिराचा समारोप होणार आहे. या कार्यक्रमाला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे संघटन सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, ज्येष्ठ नेते काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, विधान परिषदेतील गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, माजी मंत्री काँग्रेस वर्किंग कमिटाचे सदस्य नसीम खान, खा. चंद्रकांत हंडोरे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव, बी.एम. संदीप, वामशी रेड्डी, रेहाना चिश्ती, डॉ. विश्वजित कदम, आदिवासी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विक्रांत भुरिया, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी यांच्यासह वरिष्ठ नेते व पदाधिकारी उपस्थित असतील.

### पहिल्याच दिवशी महागाईचा स्फोट

मुंबई : दहीहंडी, पोळा आणि गणेशोत्सव हे महत्त्वाचे सण तोंडावर असतानाच महागाईचा बॉम्ब फुटला आहे. सप्टेंबर महिना सुरू झाला तो महागाई आणि दरवाढ घेऊनच! दोन आठवड्यांपासून साखर किलोमागे तब्बल २० रुपयांनी महागली आहे, गूळ, वेलची अगोदरच महागले आहे. हे कमी म्हणून की काय मंगळवारपासून एक लिटर दुधासाठी आता ९ रुपये जास्त मोजावे लागत आहेत. शिवाय व्यावसायिक गॅस सिलिंडर, पाईपलाईनने पुरवला जाणारा गॅस, सीएनजी, रिक्षा आणि टॅक्सीचे भाडेही महागले आहे. यात महागलेल्या कुरिअर डिलिव्हरीचाही समावेश आहे. १ सप्टेंबरपासून देशाच्या विविध भागांत व्यावसायिक एलपीजी सिलिंडर, सीएनजी आणि पीएनजीच्या दरात वाढ लागू झाली आहे.३ तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत प्रति सिलिंडर ९.५० रुपये एवढी वाढ केली आहे. ही वाढ लगेचच लागू झाली आहे.

### भोंग्याला सूर असला पाहिजे– संजय राऊत

मुंबईः ''देवेंद्र फडणवीस यांचे भाषण सुरू असताना कसे लोक झोपले होते, हे तुम्ही पाहिले का? काही आमदार डुलक्या काढत होते. तेव्हा जो भोंगा असतो तो नीट वाजला पाहिजे. भोंग्याला सूर असला पाहिजे, सनईसारखा वाजला पाहिजे. तसा आमचा वाजतो,'' असा टोला लगावत, ''हे सगळे भाषणमाफिया आहेत. एक–एक, दीड–दीड तास भाषण करायचं म्हणून मी भारतीय जनता पक्षाच्या अशा लोकांना भाषणमाफिया ३बोलतो,'' अशी बोचरी टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी बोलताना केली. सोमवारी (दि. ३१ ऑगस्ट) भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीची बैठक पुण्यात झाली. या बैठकीच्या समारोपावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाषण झाले. यावर संजय राऊत यांनी टीकेचा आसूड ओढला.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०१ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०६.५० क्विंटल | २,६०० | २,८०१ | २,६७६ |
| ज्वारी/हायब्रिड: ९०.०० क्विंटल | १,८०१ | ४,५०० | ३,२०१ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर :०.५० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| उडीद : २३.५० क्विंटल | ८,२५० | ८,२५० | ८,२५० |
| बाजरी: ३३.५० क्विंटल | २,१६० | ५,४०० | २,७६४ |
| मुग: ५४.०० क्विंटल | ६,८०० | ९,५०० | ८,९९५ |
| सोयाबीन: १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभरा: १७.५० क्विंटल | ५,४०० | ५,८७१ | ५,६०५ |

# वनपट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांना मिळणार स्वतंत्र सातबारा

## ७ ई आणि गाव नमुना १२ ई उपलब्ध होणार; दोन लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ

नागपूर । प्रतिनिधी

वनहक्कपट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांना आता स्वतंत्र सातबारा उतारा म्हणजेच नमुना ७ ई आणि गाव नमुना १२ ई उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना कर्जमाफीसह केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. राज्यातील दोन लाखांहून अधिक आदिवासी शेतकऱ्यांना या निर्णयाचा फायदा होणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी (१ सप्टेंबर) नागपुरात दिली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत म्हणजेच २ ऑक्टोबरदरम्यान महसूल पंधरवडा अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात वनहक्कपट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांना नमुना ७ ई आणि १२ ई उपलब्ध करून देण्याची विशेष मोहीम हाती घेतली जाणार आहे. आदिवासी शेतकऱ्यांना वनपट्टे मिळाले असले तरी त्यांच्या जमिनीचा स्वतंत्र महसुली रेकॉर्ड उपलब्ध नसल्याने अनेक शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येत होत्या. आता ७ ई आणि १२ ई उपलब्ध झाल्यानंतर त्यांच्या हक्काच्या जमिनीचा स्वतंत्र रेकॉर्ड तयार होईल. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेणे त्यांना शक्य होणार आहे. दरम्यान, वनहक्काचे दावे दाखल करूनही ज्यांचे दावे मान्य झालेले नाहीत, त्यांच्यासाठीही या ◀◀ पान २ वर

# सरकारच्या आश्वासनामुळे सीजेपीचा दिल्लीतील मोर्चा रद्द

## कॉकरोच जनता पार्टीचा मोठा निर्णय, सुप्रीम कोर्टात झाली तडजोड

दिल्ली । वृत्तसंस्था

**सुप्रीम कोर्टात झालेल्या सुनावणीनंतर 'कॉकरोच जनता पार्टी'ने ५ सप्टेंबर रोजी प्रस्तावित केलेला दिल्ली मार्च मागे घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. केंद्र सरकारकडून मिळालेले सकारात्मक आश्वासन आणि न्यायालयाने आज दिलेला आदेश लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.**

'कॉकरोच जनता पार्टी'ने यापूर्वी ५ सप्टेंबर रोजी दिल्लीमध्ये मार्च काढण्याची घोषणा केली होती. मात्र, मंगळवारी सुप्रीम कोर्टात झालेल्या सुनावणीदरम्यान पक्षाने आपली भूमिका बदलली. चे को–कन्व्हीनर सौरव दास यांनी न्यायालयाला माहिती देताना सांगितले की, केंद्र सरकारकडून मिळालेला सकारात्मक प्रतिसाद, न्यायालयाची प्रतिष्ठा आणि मंगळवारी पारित झालेला आदेश या सर्व बाबींचा विचार करून मार्चचे आवाहन मागे घेणे योग्य आहे. सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल यांनीही सरकारची बाजू मांडली. आंदोलकांच्या मनात सरकार आपले आश्वासन पूर्ण करेल की नाही, अशी शंका होती. याच कारणामुळे मार्चची घोषणा



करण्यात आली होती, असे त्यांनी स्पष्ट केले. आता सरकारने आपली भूमिका स्पष्ट केल्यानंतर आंदोलकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा सॉलिसिटर जनरल यांनी व्यक्त केली. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान भारताचे ◀◀ पान २ वर

### सर्वोच्च न्यायालयाकडून आंदोलकांवरील सर्व एफआरआय रद्द

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी राज्यघटनेच्या कलम १४२ अन्वये असलेल्या आपल्या विशेष अधिकारांचा वापर करून, देशभरात 'कॉकरोच जनता पार्टी'च्या नेतृत्वाखालील 'पेपर लीक' विरोधी निदर्शनांदरम्यान (२० ते २५ जुलै दरम्यान) झालेल्या घटनांबाबत युवा निदर्शकांविरुद्ध दाखल केलेले सर्व एफआयआर रद्द केले. न्यायालयाने स्पष्ट केले की, कोणत्याही राज्यात किंवा केंद्रशासित प्रदेशात या घटनांशी संबंधित इतर कोणत्याही एफआयआरवर पुढील कार्यवाही किंवा तपास केला जाऊ नये आणि ते सर्व प्रकारे 'बंद' मानले जावेत. एफआयआर रद्द करण्याबाबत पाच राज्यांनी दाखल केलेले अर्ज मंजूर करताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, २० ते २६ जुलै दरम्यानच्या घटनांसाठी कोणत्याही राज्याने किंवा केंद्रशासित प्रदेशाने नवीन एफआयआर नोंदवू नये.



# जरांगेंची तब्येत बिघडली तपासणीस दिला नकार

जालना । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा मंगळवारी चौथा दिवस होता. दुपारी दीडच्या सुमारास त्यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली. जरांगे पाटील यांना उलटी आणि मळमळ होत असल्याचे सांगण्यात आले. मात्र मनोज जरांगे पाटील यांनी उपचार घेण्यास नकार दिला ◀◀ पान २ वर

# सुटे तेल विक्रीला वर्षाची मुदतवाढ

## लहान व्यापाऱ्यांसाठी सरकारने तुकाराम मुंढे यांचा निर्णय फिरवला



मुंबई । वृत्तसंस्था

सनदी अधिकारी तुकाराम मुंढे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त झाल्यापासून राज्यात खाद्यपदार्थातील भेसळ कमी झाली आहे. खाद्यपदार्थातील भेसळ, निकृष्ट दर्जाचे जेवण आढळताच तुकाराम मुंढे थेट कारवाई करताना दिसत आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी सुट्ट्या तेलाची विक्री बंद केली. खाद्यतेलाची विक्री करताना तेलकंपन्यांना नियमांचे पालन करावे लागेल, असे तुकाराम मुंढे यांनी ठणकावून सांगितले. दरम्यान, तुकाराम मुंढे यांच्या या निर्णयामुळे छोटे व्यावसायिक, व्यापारांना मोठा फटका बसत आहे, असा दावा केला जात होता. असे असतानाच आता राज्य सरकारने तुकाराम मुंढे यांनी घेतलेला निर्णय फिरवला आहे. सुटे खाद्यतेल विकण्यासाठी सरकारने एका वर्षाची मुदत दिली आहे. ◀◀ पान २ वर

# जालना जिल्ह्यातील शाळा सुविधांचा अहवाल सादर करा!

## जि.प.शाळांबाबत ना. पंकजाताई मुंडे अ‍ॅक्शन मोडवर ; मंत्रालयात ऑनलाईन बैठकीत घेतला आढावा



मुंबई / जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, कंपाऊंड वॉल आदींची सद्यःस्थितीबाबत पाहणी करून येत्या पाच तारखेपर्यंत अहवाल देण्याचे निर्देश पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी दिल्या. तसेच जालना जिल्ह्यातील शैक्षणिक ◀◀ पान २ वर

### शाळांमधून समता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश

शाळांच्या भिंतींवरील चित्रे व संदेश हे केवळ सजावटीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये समता, सामाजिक सलोखा, सर्वसमावेशकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणारे असावेत. पंचतंत्रातील कथा, संत–महापुरुषांचे विचार, प्रेरणादायी प्रसंग आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या चित्रांचा समावेश करावा. स्थानिक संस्कृती आणि परिसराशी सुसंगत अशी बालस्नेही संकल्पना तयार करण्याच्या सूचना श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिल्या.

# अमित शहांच्या कार्यक्रमात मुस्लिम अधिकाऱ्यांना नो एन्ट्री?

## एकाला रांगेतून, दुसऱ्याला बैठकीतून बाहेर काढले–महुआ मोईत्रा



दिल्ली । वृत्तसंस्था

**तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी एक खळबळजनक आरोप केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या पश्चिम बंगाल दौऱ्यादरम्यान मुस्लिम आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांना मंत्र्यांच्या कार्यक्रमांपासून दूर ठेवण्यात आल्याचा दावा मोईत्रा यांनी केला आहे.**

वरिष्ठ अधिकाऱ्यांना केंद्रीय मंत्र्यांसमोर जाण्यापासूनही रोखण्यात ◀◀ पान २ वर

# मारकुटा नगरसेवक रमेश म्हात्रेवर सर्वोच्च न्यायालय भडकले

## डॉक्टरांवर हल्ला करणाऱ्यांना जामीन मिळायलाच नको–सुप्रीम कोर्ट

दिल्ली । वृत्तसंस्था

'रुग्णालयात घुसून डॉक्टरांवर हल्ला करणाऱ्या व्यक्तींना जामीन मिळण्याचा कोणताही अधिकार नाही. अशा लोकांना वैद्यकीय क्षेत्राबद्दल किंवा डॉक्टरांबद्दल कोणताही आदर नसतो,'' अशा कडक शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना नगरसेवक रमेश म्हात्रे याला फटकारले. कल्याण–डोंबिवली ३महापालिकेच्या शास्त्रीनगर सार्वजनिक रुग्णालयातील डॉक्टरांना झालेल्या मारहाण प्रकरणी



मुंबई उच्च न्यायालयाने जामिनावर लादलेल्या अत्यंत कठोर अटींविरुद्ध ◀◀ पान २ वर

# 'एक्सपायरी'चा काळाबाजार!

## जुन्या खाद्यपदार्थांवर नव्या तारखा छापून विक्री, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ; नवी मुंबईत ११ निर्यातदार कंपन्यांविरोधात कारवाई

नवी मुंबई । प्रतिनिधी

**नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या गंभीर प्रकाराचा नवी मुंबई गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. विविध नामांकित कंपन्यांच्या खाद्यपदार्थांच्या पॅकेटवरील उत्पादन तारीख, 'बेस्ट बिफोर', 'एक्सपायरी डेट', बॅच नंबर आणि कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) यामध्ये बेकायदेशीरपणे फेरफार करून त्याच खाद्यपदार्थांची विक्री तसेच निर्यात केली जात असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोघांविरुद्ध कारवाई केली असून, सुमारे ७५ लाख २१ हजार २६९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नवी मुंबई गुन्हे शाखेने तुर्भे येथील टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील एका गोदामावर छापा टाकला. या कारवाईदरम्यान खाद्यपदार्थांच्या मूळ पॅकेटवरील उत्पादन व मुदत संपण्याची माहिती तपासण्यात आली. त्यावेळी जुन्या तारखा बदलून पॅकेटवर नव्या तारखा छापण्यासाठी विशेष 'डेट प्रिंटिंग मशीन'चा वापर केला जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन संयुक्त कारवाई केली. तब्बल सहा दिवस करण्यात आलेल्या तपासणीत १८ निर्यातदारांचा सुमारे २ कोटी ४६ लाख ५३ हजार ३५४ रुपयांचा माल तपासण्यात आला. त्यापैकी ११ निर्यातदारांच्या सुमारे ७५ लाख २१ हजार २६९ रुपयांच्या मालावरील लेबल, उत्पादन तारीख, एक्सपायरी अथवा बेस्ट बिफोर तारीख, बॅच नंबर आणि एमआरपीमध्ये फेरफार केल्याचे आढळून आले. कारवाईदरम्यान खाद्यपदार्थांवरील तारखा बदलण्यासाठी वापरण्यात येणारी मशीन, ◀◀ पान २ वर



# सामूहिक बलात्काराच्या गुन्हावरही सरकार पडदा टाकेल – राहुल गांधी

नोएडा । वृत्तसंस्था



येथे एका धावत्या बसमध्ये अल्पवयीन मुलीवर झालेल्या कथित सामूहिक बलात्काराच्या घटनेवरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मंगळवारी केंद्र आणि उत्तर प्रदेश सरकारवर जोरदार टीका केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडील गृहखात्यावर कोणतीही जबाबदारी निश्चित होण्याची शक्यता नाही, कारण या गुन्ह्यावरही नेहमीप्रमाणे पडदा टाकला जाईल, असे राहुल गांधी म्हणाले.

दिल्ली–एनसीआर महिलांसाठी इतके असुरक्षित झाले आहे की ग्रेटर नोएडा ते दिल्ली अशा ४७ किलोमीटरच्या ◀◀ पान २ वर

## अग्रलेख

# व्हॉट्सअॅप वर डॉक्टरांची हकालपट्टी

## फडणवीस सरकारला रुग्णांच्या जीवापेक्षा फाईल मोठी वाटते?

मुंबईतील ग्रँट गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज आणि सर जे. जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्समधील १९ सहाय्यक प्राध्यापकांच्या तात्पुरत्या नियुक्त्या अचानक रद्द करण्याचा प्रकार महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या विदारक वास्तवावर बोट ठेवणारा आहे. विशेषतः शस्त्रक्रिया सुरू असताना डॉक्टरांच्या मोबाईलवर 'सेवा समाप्त' झाल्याचा व्हॉट्सअॅप संदेश पाठविला जात असेल, तर हा केवळ प्रशासकीय निर्णय राहत नाही; तो सरकारच्या आरोग्य धोरणाच्या प्राधान्यक्रमांवरच प्रश्नचिन्ह उभे करणारा प्रकार ठरतो.

फडणवीस सरकारकडून विकास, आधुनिक आरोग्य सुविधा आणि वैद्यकीय पायाभूत सुविधांच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. नवीन इमारती, उपकरणे, प्रकल्प आणि डिजिटल व्यवस्था यांची आकडेवारी सांगितली जाते. पण रुग्णालयात रुग्ण तपासण्यासाठी, शस्त्रक्रिया करण्यासाठी आणि गंभीर रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी डॉक्टरच अपुरे असतील, तर या सगळ्या घोषणांचा उपयोग काय? आरोग्यव्यवस्थेची खरी ताकद इमारतीत नसते; ती डॉक्टर, परिचारिका आणि उपलब्ध मनुष्यबळात असते. जे. जे. रुग्णालयातील कार्डिओलॉजी, सीटीव्हीएस, न्यूरोसर्जरी आणि नेत्ररोगशास्त्र यांसारखे विभाग कोणत्याही प्रशासकीय प्रयोगासाठी खेळाचे मैदान नाहीत. येथे येणारा रुग्ण बहुधा गंभीर अवस्थेत असतो. हृदयाची शस्त्रक्रिया, मेंदूवरील शस्त्रक्रिया किंवा इतर गुंतागुंतीच्या उपचारांसाठी रुग्ण सरकारी रुग्णालयाकडे आशेने पाहतो. अशा विभागांमध्ये कामाचा ताण कमी करण्यासाठी प्रशासनानेच तात्पुरत्या नियुक्त्या केल्या असतील, तर त्या डॉक्टरांना अचानक दूर करण्यापूर्वी रुग्णसेवेची पर्यायी व्यवस्था केली का, हा साधा प्रश्न आहे. सरकारकडे नियमांचा दाखला आहे. नियमित किंवा एमपीएससीमार्फत उमेदवार उपलब्ध झाल्यास तात्पुरती नियुक्ती संपुष्टात येऊ शकते. नियम चुकीचा असेलच असे नाही. पण नियम म्हणजे विवेकबुद्धीचा पर्याय नाही. नियम लागू करताना परिस्थिती, रुग्णभार, विभागाची गरज आणि सुरू असलेल्या उपचारांची सातत्यता यांचा विचार करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. विशेष म्हणजे डॉक्टर प्रत्यक्ष शस्त्रक्रिया करीत असताना त्यांच्या हातातील काम संपविण्याचा संदेश मोबाईलवर पोहोचतो, ही बाब धक्कादायक आहे. एखाद्या सरकारी कार्यालयातील कंत्राटी कर्मचाऱ्याची सेवा संपविणे आणि ऑपरेशन थिएटरमध्ये रुग्णाच्या जीवाशी संबंधित जबाबदारी पार पाडणाऱ्या डॉक्टराला अचानक दूर करणे यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. आरोग्य प्रशासनाने हा फरक समजून घेतला नसेल तर समस्या केवळ एका निर्णयात नाही; समस्या धोरणाच्या दृष्टिकोनात आहे. फडणवीस सरकारच्या आरोग्य धोरणाला आता एक मूलभूत प्रश्न विचारण्याची वेळ आली आहेफ रुग्ण महत्त्वाचा की मनुष्यबळाची कागदी आकडेवारी? सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची कमतरता असल्याच्या तक्रारी सातत्याने ऐकू येतात. दुसरीकडे खासगी रुग्णालयातील उपचार सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहेत. अशा परिस्थितीत सार्वजनिक रुग्णालये मजबूत करण्याऐवजी उपलब्ध डॉक्टरांनाच अस्थिर केले जात असेल, तर सरकार नेमके कोणत्या दिशेने चालले आहे? तात्पुरती नियुक्ती ही कायमस्वरूपी उपाययोजना नाही, हे मान्य. पण कायमस्वरूपी भरतीची प्रक्रिया संथ असेल, रिक्त पदे दीर्घकाळ पडून राहत असतील आणि त्या काळात रुग्णभार वाढत असेल, तर प्रशासनाने अंतरिम व्यवस्था करणे अपरिहार्य आहे. डॉक्टर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारची; डॉक्टर हटविल्यानंतर रुग्णसेवा सुरळीत ठेवण्याची जबाबदारीही सरकारचीच. राज्य वैद्यकीय शिक्षक संघटनेने या प्रकाराला विरोध करून १९ डॉक्टरांच्या पुनर्नियुक्तीची मागणी केली आहे. सरकारने या मागणीकडे केवळ कर्मचारी संघटनेचा दबाव म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा प्रश्न वैद्यकीय शिक्षकांचा असला तरी त्याचा थेट परिणाम रुग्णांवर होतो. कार्डिओलॉजी किंवा न्यूरोसर्जरी विभागातील एका डॉक्टरच्या उपलब्धतेचा प्रश्न एखाद्या गंभीर रुग्णासाठी जीवन-मरणाचा प्रश्न असू शकतो. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी या डॉक्टरांना पुन्हा सामावून घेण्याचा किंवा इतर रिक्त जागांवर नियुक्त करण्याचा सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन दिल्याचे सांगितले जाते. आता सरकारने या आश्वासनाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. केवळ बैठक, आश्वासन आणि प्रसिद्धीपत्रकांनी आरोग्यव्यवस्था सुधारत नाही. रुग्णालयाच्या प्रत्यक्ष वॉर्डमध्ये, ऑपरेशन थिएटरमध्ये आणि बाह्यरुग्ण विभागात सरकारचे धोरण दिसले पाहिजे. या घटनेने आणखी एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहेसरकारी आरोग्यव्यवस्थेचे प्रशासन डॉक्टरांना 'मनुष्यबळ' म्हणून पाहते की 'रुग्णसेवेचे आधारस्तंभ' म्हणून? जर डॉक्टर फक्त पदसंख्या आणि रिक्त जागांच्या तक्त्यातील आकडे असतील, तर रुग्णसेवेचा मानवी चेहरा कुठे राहतो? फडणवीस सरकारने या प्रकरणाकडे प्रतिष्ठेचा प्रश्न म्हणून पाहू नये. १९ डॉक्टरांना परत घेतले किंवा नाही, एवढ्यावर या प्रकरणाचे गांभीर्य संपत नाही. भविष्यात अशा प्रकारे कार्यरत वैद्यकीय कर्मचाऱ्यांना हटविताना रुग्णसेवेची सातत्यपूर्ण व्यवस्था, जबाबदारीचे हस्तांतरण आणि पारदर्शक प्रशासकीय प्रक्रिया अनिवार्य करण्याची गरज आहे. आरोग्य विभागात 'डिजिटल महाराष्ट्र'ची भाषा बोलताना डॉक्टरांना बडतर्फीचा संदेश व्हॉट्सअॅपवर पाठविणे हा डिजिटल कारभाराचा विजय नसून प्रशासकीय संवेदनशून्यतेचा पराभव आहे. सरकारने हे लक्षात ठेवावेरुग्णालयातील रुग्ण हा फाईल क्रमांक नाही. त्याच्या छातीत धडधडणारे हृदय आहे, मेंदू आहे, कुटुंबाची आशा आहे आणि जगण्याची इच्छा आहे. त्या रुग्णावर शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टराला अचानक व्हॉट्सअॅपवरून हटविण्यापूर्वी सरकारने या सगळ्यांचा विचार केला पाहिजे. सरकारे येतात-जातात, मंत्री बदलतात, अधिकारी बदलतात; पण रुग्णालयातील रुग्णाचा जीव कोणत्याही सरकारच्या फाईलपेक्षा मोठा असतो. म्हणूनच १९ डॉक्टरांच्या नियुक्तीचा निर्णय तातडीने पुनर्विचारात घ्यावा. रुग्णसेवेवर परिणाम होणार नाही याची हमी द्यावी. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला घोषणांच्या नव्हे, तर पुरेशा डॉक्टरांच्या, पारदर्शक भरतीच्या आणि संवेदनशील प्रशासनाच्या आधारावर उभे करावे. अन्यथा प्रश्न १९ डॉक्टरांचा राहणार नाही. प्रश्न असा असेलफडणवीस सरकारच्या आरोग्य धोरणात 'रुग्ण' नेमका कुठे आहे?

# जात पडताळणी कार्यालयाचा भोंगळ कारभार; कर्मचाऱ्यांची हुकूमशाही!

## शासकीय सर्व्हर बंद, पण खासगी केंद्रात मात्र सुरू?

जालना । प्रतिनिधी

**व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अवघ्या काही दिवसांवर आली असताना, जालना जिल्हा जात पडताळणी कार्यालयाच्या अनागोंदी आणि भोंगळ कारभारामुळे मागासवर्गीय विद्यार्थी आणि पालक प्रचंड मनस्ताप सहन करत आहेत. १ ते ४ सप्टेंबर दरम्यान ही प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार असून, शासकीय सवलतींचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र (तरश्रळवळीं उशीीळषळलरींश) सादर करणे अनिवार्य आहे. मात्र, कार्यालयाच्या ढिसाळ नियोजनामुळे ऐन प्रवेश प्रक्रियेच्या तोंडावर हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे.**

शासकीय नियमांनुसार, विद्यार्थ्यांनी जात पडताळणीसाठी ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर ४५ दिवसांच्या आत संबंधित प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. जर अर्जात काही त्रुटी नसताना सुद्धा तुरटी असल्याचे सांगून मुला-मुलींना व पालकांना जाणून बुजून त्रास दिला जात आहे. याप्रकरणी वरिष्ठ अधिकारी श्रीमती मकरंद मॅडम यांचे आदेशाचे पालन कर्मचारी कार्यालय मधील करीत नसल्याचे हा प्रकार समोर आले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करून बदली करण्यात यावी. अशी मागणी मुला मुलीच्या पालकाकडून करण्यात येत आहे . याप्रकरणी जिल्हाधिकारी व जिल्ह्याचे पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी तत्काळ लक्ष देऊन शैक्षणिक मुला मुलीचा प्रश्न निकाली काढावे व तसेच या जात पडताळणी विभागातील कर्मचारी किती वर्षापासून आहे त्यांची बदली करण्यात यावे अशी पण मागणी करण्यात येत आहे.


**खासगी केंद्रात सर्व्हर सुरू; शासकीय कार्यालयात मात्र बंद ? संशयास्पद कारभार**

या संपूर्ण प्रकरणात एक अत्यंत धक्कादायक आणि संशयास्पद प्रकार समोर आला आहे. जात पडताळणी कार्यालयातील संगणक यंत्रणा विभागातील शासकीय कर्मचारी व खाजगी कर्मचारी यांच्याकडून सर्व्हर डाऊन असल्याचे कारण सांगून नागरिकांना हुसकावून लावले जात असताना, बाहेरील खासगी सायबर कॅफे आणि महा-ई-सेवा केंद्रांवर मात्र हेच सर्व्हर सुरळीत सुरू असल्याचे दिसून आले. काही चाणाक्ष नागरिकांनी बाहेरील खासगी केंद्रांवर जाऊन तपासणी केली असता, तिथून त्यांचे प्रमाणपत्र सहज डाऊनलोड झाले. शासकीय कार्यालयात 'डाऊन' असलेले सर्व्हर बाहेर खासगी केंद्रात कसे काय चालते? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला असून, यामागे काही आर्थिक देवाणघेवाणीचे रॅकेट सुरू आहे असा संशय आता व्यक्त केला जात आहे. जालना जिल्हा जात पडताळणी अधिकारी संगीता मकरंद आणि संशोधन अधिकारी श्रावस्ती मेश्राम यांच्याकडे बीड जिल्ह्याचाही अतिरिक्त कार्यभार आहे. दोन्ही जिल्ह्यांची जबाबदारी एकाच अधिकाऱ्यांवर असल्याने महत्त्वाच्या प्रमाणपत्र ओबीसी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आलेले असताना, याप्रकरणी शासकीय कर्मचारी व खाजगी कर्मचारी जबाबदार असल्याचे बोलल्या जात आहे. जात पडताळणी विभागातील श्रीमती मकरंद मॅडम यांचे आदेशाचे पालन शासकीय कर्मचारी व खाजगी कर्मचारी करीत नसल्याचे हा प्रकार समोर आला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेशाचे पालन करीत नसल्यामुळे प्रमाणपत्रामुळे मुला मुलीची नुकसान होण्याची शक्यता आहे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# कलाकारांच्या नाट्यगृहाच्या सुरक्षेत आणि नूतनीकरणात दिरंगाई खपवून घेणार नाही-अनिल जगताप

बीड । प्रतिनिधी

बीडमधील कलाकारांच्या हक्काचे आणि शहराच्या सांस्कृतिक वैभवाचे केंद्र असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची झालेली दुरवस्था, नशाधुंद टोळक्यांकडून करण्यात आलेली तोडफोड, परिसरात सुरू असलेले मद्यपान तसेच साऊंड सिस्टम चोरीला जाण्याच्या घटनांवरून शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड नगर पालिका प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. कलाकारांच्या हक्काच्या नाट्यमंदिराची अशी अवस्था आम्ही अजिबात सहन करणार नाही. नाट्यगृह सुरक्षित ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. सुरक्षा व्यवस्थेत कोणतीही हलगर्जीपणा अथवा दिरंगाई चालणार नाही, अशा कडक शब्दांत अनिलदादा जगताप यांनी बीड नगर पालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांना सूचना दिल्या.



नाट्यगृहात वारंवार घडणाऱ्या अनुचित प्रकारांच्या पार्श्वभूमीवर अनिलदादा जगताप यांनी काल दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी दु. २.०० वाजताच्या मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांना प्रत्यक्ष नाट्यगृहात बोलावून परिस्थितीची पाहणी केली आणि माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नाट्यगृहाच्या सुरक्षेबाबत प्रशासनाची जबाबदारी निश्चित करत तात्काळ दोन सुरक्षा रक्षक नियुक्त करा, बंद असलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करा आणि नाट्यगृहाच्या परिसरात कोणत्याही प्रकारे गैरप्रकार होणार नाहीत याची व्यवस्था करा, असे स्पष्ट निर्देश दिले. तसेच नाट्यगृहाच्या आवारात कचरा घंटागाड्या लावण्याच्या प्रकारावरही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. नाट्यगृह हा कचरा साठवण्याचा परिसर नाही. हा कलाकारांचा आणि रसिकांचा सांस्कृतिक वारसा आहे. त्यामुळे तात्काळ घंटागाड्या हटवा, अशा शब्दांत त्यांनी पालिका प्रशासनाला सुनावले. नाट्यगृहाचे व्यवस्थापनही योग्य पद्धतीने झाले पाहिजे, अशी भूमिका घेत कलेची जाण असणारा व्यवस्थापक नियुक्त करा, अशी स्पष्ट सूचना त्यांनी मुख्याधिकारी मांडूरके यांना केली.

### नाट्यगृहाच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना करणार- मुख्याधिकारी मांडूरके

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी नाट्यगृह सुरक्षेबाबत दिलेल्या सूचनेचे पालन करून नाट्यगृहाच्या सुरक्षेबाबत प्रशासनाकडून तातडीने आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. नाट्यगृहात दोन सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याची कार्यवाही केली जाईल. बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने सुरू करण्यात येतील. नाट्यगृह परिसरातील घंटागाड्या हटवून स्वच्छता व्यवस्था करण्यात येईल. नाट्यगृहाचे व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी कलेची जाण असणारा व्यवस्थापक नियुक्त करण्याबाबत कार्यवाही केली जाईल. कलाकार व रसिकांसाठी नाट्यगृह सुरक्षित, स्वच्छ आणि सुव्यवस्थित ठेवण्यासाठी नगरपालिका प्रशासन आवश्यक ती सर्व कार्यवाही करेल. असे बीड नगर पालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

त्याचबरोबर नाट्यगृह परिसरात तातडीने स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण परिसर स्वच्छ आणि सुरक्षित करण्याचे निर्देशही देण्यात आले. नाट्यगृहाच्या नूतनीकरणाच्या कामाला होत असलेल्या विलंबाबाबत अनिलदादा जगताप यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. तोंडे यांनाही कडक शब्दांत सूचना दिल्या. नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे काम तातडीने सुरू करण्याचे निर्देश देत त्यांनी येत्या आठ दिवसांत कामाचा कार्यारंभ झाला पाहिजे, असे स्पष्ट बजावले. यावर श्री. तोंडे यांनी येत्या आठ दिवसांत नाट्यगृह नूतनीकरणाच्या कामास कार्यारंभ करून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी बीड नगर पालिका बांधकाम सभापती संजय उडान, कलावंत लक्ष्मीकांत दोडके, प्रतिक कांबळे तसेच शिवसेना व अंगीकृत संघटनेचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच बीडमधील कलाकार मंडळी उपस्थित होती.

## पान १ वरून...

### वनपट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांना

अभियानादरम्यान विशेष कार्यवाही करण्यात येणार आहे. ग्रामस्तरीय तसेच जिल्हास्तरीय वनहक्क समित्यांमार्फत अशा दाव्यांचे पुनर्विलोकन केले जाणार आहे. ज्या शेतकऱ्यांना वनपट्टे मिळालेले नाहीत, मात्र त्यांचे दावे प्रलंबित किंवा नामंजूर आहेत, त्यांचे दावे पुन्हा स्वीकारण्याची प्रक्रिया राबविली जाणार ३आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांच्या दाव्यांपेक्षा कमी क्षेत्र मंजूर झाले आहे, अशा प्रकरणांचाही पुनर्विचार केला जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. याबाबतचा शासन निर्णय जारी होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत ही विशेष मोहीम राबविण्यात येणार असून, वनपट्टेधारकांना ७ ई आणि १२ ई देणे, कमी क्षेत्र मंजूर झालेल्या दाव्यांची पूर्तता करणे आणि नामंजूर दावे पुन्हा स्वीकारणे, अशी या अभियानाची प्रमुख उद्दिष्टे असतील.

--------------

### जरांगेंची तब्येत बिघडली

असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे आंदोलनस्थळी उपस्थित असलेल्या समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषणाला बसले आहेत. उपोषणाच्या चौथ्या दिवशी त्यांच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम जाणवू लागला आहे. त्यांना मळमळ आणि उलटीचा त्रास झाल्याने आरोग्य पथकातील डॉक्टरांनी त्यांची तपासणी करण्याचा प्रयत्न केला. आंदोलनस्थळी तैनात असलेल्या आरोग्य पथकातील डॉक्टरांनी मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती तपासण्यासाठी दोन-तीन वेळा प्रयत्न केला. मात्र, जरांगे पाटील यांनी वैद्यकीय तपासणी करून घेण्यास नकार दिला. त्यामुळे डॉक्टरांना त्यांच्या प्रकृतीबाबत आवश्यक वैद्यकीय निरीक्षण नोंदवता आले नाही. उपोषणामुळे शरीरावर होणारे परिणाम लक्षात घेता डॉक्टरांकडून त्यांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. मात्र, जरांगे पाटील यांनी तपासणीस नकार दिल्याने आरोग्य पथकासमोरही अडचण निर्माण झाली आहे.

---------

### सरकारच्या आश्वासनामुळे सीजेपीचा

सरन्यायाधीश यांनीही महत्त्वपूर्ण टिप्पणी केली. दोन्ही बाजूंनी सकारात्मक भावना दाखवली, तर संपूर्ण प्रकरण सहजपणे सोडवता येऊ शकते, असे त्यांनी नमूद केले. सीजेआय यांच्या या भूमिकेमुळे सरकार आणि 'कॉकरोच जनता पार्टी' यांच्यातील वाद शांततापूर्ण पद्धतीने सोडवण्याच्या प्रयत्नांना महत्त्व प्राप्त झाले आहे. सुप्रीम कोर्टातील सुनावणी आणि केंद्र सरकारच्या आश्वासनानंतर 'कॉकरोच जनता पार्टी'ने ५ सप्टेंबरचा प्रस्तावित दिल्ली मार्च मागे घेतला आहे. त्यामुळे ५ सप्टेंबरला होणारे आंदोलन आता होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. सरकार आणि संघटनेदरम्यान झालेल्या या घडामोडीकडे कायदेशीर तसेच सामाजिक पातळीवर सकारात्मक पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

-------------

### जालना जिल्ह्यातील शाळा सुविधांचा

सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आदर्श शाळा, अंगणवाडी, आधुनिक ग्रंथालये आणि क्रीडांगणांच्या विकासाचा सर्वसमावेशक आराखडा तयार करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील वर्गखोल्यांची दुरुस्ती तसेच नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामाबाबत तसेच जालनाई सिल्क ब्रँडिंगबाबत पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी मंगळवारी मंत्रालयीन दालनातून ऑनलाईन आढावा घेतला. यावेळी जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा उपस्थित होते. तर जिल्हापरिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे यांच्यासह इतर अधिकारी हे दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम, जुन्या वर्गखोल्यांची दुरुस्ती, मुला-मुलींसाठीची शौचालयाची स्थिती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदींचा त्यांनी आढावा घेतला. जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाडी आणि ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतींची सद्यस्थिती, आवश्यक दुरुस्ती, उपलब्ध निधी आणि प्रलंबित कामे यांचा आढावा घेण्यात यावा. निधी मंजूर असूनही निविदा प्रक्रिया अथवा प्रशासकीय कार्यवाही वेळेत पूर्ण न झाल्याने निधी अखर्चित राहणे स्वीकारले जाणार नाही. अशा प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असेही श्रीमती मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच पुढील काही दिवसात जिल्ह्यातील अंगणवाडी व ग्रामपंचायत इमारतींचा आढावा घेण्यात येणार असून यासंदर्भातील अहवाल तयार करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिली. मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यात शाळांच्या डिजिटलायझेशन, आदर्श शाळा उपक्रमासाठी निधी उपलब्ध आहे. या निधीतून अस्तित्वातील अधिकाधिक शाळांचा दर्जा सुधारण्यावर भर द्यावा. रंगरंगोटी, आवश्यक दुरुस्ती, बालस्नेही सजावट, डिजिटल वर्गखोल्या, दर्जेदार बाके, पुस्तके आणि क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

---------

### सुटे तेल विक्रीला वर्षाची

सुटे तेल विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीत व्यापाऱ्यांनी त्यांच्या अडचणी फडणवीस यांना सांगितल्या. याच चर्चेनंतर व्यापाऱ्यांना सुटे तेल विकण्यासाठी एका वर्षाची मुदत देण्यात आली आहे. मात्र यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही, असे फडणवीस यांनी सांगितले आहे. तसेच सर्वांना कायदा पाळावाच लागेल. या १ वर्षात प्रत्येकाने आपल्या व्यवसायात अनुकूल बदल करावा, असे आवाहनही त्यांनी केले. सुट्या तेलाच्या मुद्द्यावर बोलताना २०११ साली हा कायदा झाला. गुणवत्ता हा महत्वाचा निकष आहे. पण अनेक गरीब माणसं सुटे तेल घेतात. त्यामुळे कायदा आणि सामान्य माणूस यातून मार्ग काढला पाहिजे. कायद्याचे पालन करताना पारंपरिक व्यावसायिकांना काय बदल करावे लागतील याचा अभ्यास करण्यासाठी समिती गठित करणार आहोत. एफडीए आणि व्यापा-यांची संयुक्त समिती असेल. आवश्यकता भासल्यास राज्य सरकार मदत करेल, असे फडणवीस यांनी सांगितले.

-------------

### मारकुटा नगरसेवक रमेश म्हात्रेवर

म्हात्रेनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान खंडपीठाने अत्यंत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. ''ज्या वेळी एखाद्या जमावाकडून रुग्णालयावर हल्ला केला जातो, तेव्हा तिथल्या कर्मचाऱ्यांची काय मानसिक अवस्था होत असेल याची कल्पना करा. तुम्ही सरळ रुग्णालयात घुसून समोर दिसेल त्या व्यक्तीला मारहाण करणार का?'' असा सवाल न्यायालयाने केला. ६ जुलै २०२६ रोजी गरोदर महिलेला उपचारासाठी वाट पाहायला लावल्याचा आरोप करत तिच्या नातेवाईकांनी कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या शास्त्रीनगर सार्वजनिक रुग्णालयातील नगरसेवक रमेश म्हात्रे यांना फोन करून बोलावले होते. त्यानंतर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांशी म्हात्रे आणि त्यांच्या समर्थकांचा वाद झाला. रमेश म्हात्रेंनी डॉक्टरांना मारहाण केली. या प्रकरणी ७ जुलै रोजी दाखल एफआयआरमध्ये म्हात्रे यांना मुख्य आरोपी करण्यात आले. कल्याण न्यायदंडाधिकाऱ्यांनी १४ जुलै रोजी म्हात्रे यांचे वय, वैद्यकीय कारणे आणि सीसीटीव्ही फुटेज प्राप्त झाल्याचे नमूद करत जामीन मंजूर केला होता. मात्र, डॉक्टरांच्या तीव्र आंदोलनानंतर मुंबई उच्च न्यायालयाने १८ जुलै रोजी या प्रकरणाची स्वतःहून दखल घेत जामिनाला स्थगिती दिली आणि म्हात्रे यांना आत्मसमर्पण करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर दोन आठवड्यांनी उच्च न्यायालयाने म्हात्रे यांना जामीन मंजूर केला, पण त्यावर अत्यंत कडक अटी लादल्या. उच्च न्यायालयाने म्हात्रे यांना खटला सुरू होईपर्यंत महाराष्ट्र सोडून गोव्यातील कलंगूट येथे राहण्याचे, अणजुणा पोलिस ठाण्यात आठवड्यातून तीनदा हजेरी लावण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय, हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवणे, फॉरेन्सिक तपास आणि विशेष सरकारी वकिलांची नियुक्ती यांसारख्या उच्च न्यायालयाच्या निर्देशांनाही म्हात्रे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

---------

### अमित शहांच्या कार्यक्रमात मुस्लिम

आल्याचे त्यांनी म्हटले आहे. पश्चिम बंगालच्या कृष्णानगर मतदारसंघाच्या खासदार असलेल्या महुआ मोइत्रा यांनी मंगळवारी (१ सप्टेंबर) सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट करत हे आरोप केले आहेत. या प्रकरणी त्यांनी आयएएस आणि आयपीएस असोसिएशनने मौन बाळगल्याबद्दल तीव्र सवालही उपस्थित केले आहेत. महुआ मोइत्रा यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, बंगालमध्ये अमित शाह यांच्या उपस्थितीत मुस्लिम अधिकाऱ्यांना रोखण्यात आले. सिलिगुडीचे सीपी वकार रझा यांना स्वागत करणाऱ्या रांगेतून बाजूला सारण्यात आले, डीजी एसटीएफ जावेद शमीम यांना कुठेही बोलावले गेले नाही आणि आयएएस खलील अहमद यांना बैठकीतून बाहेर जाण्यास सांगण्यात आले. या सांप्रदायिक प्रकाराचा तुम्ही निषेध करणार नाही का?'' केंद्रीय गृहमंत्री अमित शाह गेल्या महिन्यात २१ आणि २२ ऑगस्ट रोजी पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यादरम्यान त्यांनी पश्चिम बंगाल आणि केंद्रीय दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली होती. या बैठकीत देशाच्या पूर्व सीमांच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला, ज्यामध्ये प्रामुख्याने सिलिगुडी कॉरिडॉरवरील सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यावर भर देण्यात आला होता. चिकन नेक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कॉरिडॉरची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. सीमा सुरक्षेवर लक्ष ठेवणे, गुप्तचर यंत्रणा, केंद्रीय सुरक्षा दले आणि राज्य पोलीस व प्रशासनामध्ये उत्तम समन्वय साधणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. या दौऱ्यादरम्यान भारतीय मुळाच्या व्यक्तींच्या हालचाली, जनसांख्यिकीय बदल, अवैध घुसखोरी आणि सीमावर्ती भागातील विविध मुद्द्यांवरही चर्चा करण्यात आली. गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उच्चस्तरीय बैठकीत गृह मंत्रालय, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारतीय सेना, सीमा सुरक्षा दल, सशस्त्र सीमा बल आणि रेल्वे सुरक्षा दल यांसारख्या केंद्रीय व राज्य यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. याशिवाय पश्चिम बंगालचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक देखील या बैठकीस उपस्थित होते.

------------

### सामूहिक बलात्काराच्या गुन्हावरही सरकार पडदा

प्रवासादरम्यान स्लीपर बसमध्ये एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. संपूर्ण दिल्ली पोलिसांना किंवा नोएडा पोलिसांना या घटनेची पुसटशीही कल्पना नव्हती, ही अत्यंत आश्चर्यकारक बाब आहे, असे गांधी यांनी एक्स वर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे. ही बस नोएडा-ग्रेटर नोएडा एक्सप्रेसवे, दिल्लीचा रिंग रोड, हे सर्व पार करत गेली, पण एकाही चेकपॉईंटवर तिला एकदाही अडवले गेले नाही. बसच्या सीटवर पडदे ओढलेले होते जेणेकरून आत काय चालले आहे ते कोणालाही दिसू नये आणि गुन्हेगारांना तर प्रशासनाची जराही भीती नव्हती असे ते म्हणाले. निर्भया प्रकरणाला एवढी वर्षे उलटून गेल्यानंतरही आणि अशा अनेक घटना घडल्यानंतरही, अशा प्रकारच्या बसेसची तपासणी आणि देखरेख करण्याच्या नियमांचे पालन अद्याप का केले जात नाही, असा सवाल राहुल गांधी यांनी विचारला. 'ते पडदे फक्त त्या एका बसवरच ओढलेले नव्हते तर प्रशासनाच्या अपयशावर वर्षानुवर्षे सरकारकडून टाकल्या जाणाऱ्या पडद्यांचाच हा परिणाम आहे. ज्यामुळे देशाच्या राजधानीतही महिलांना सुरक्षितपणे प्रवास करणे शक्य राहिलेले नाही अशा कडक शब्दात राहुल गांधी यांनी गृहखात्याच्या कारभारावर ताशेरे ओढले. केंद्र आणि राज्य सरकारे ही व्यवस्था सुधारण्यापूर्वी आणखी किती महिला आणि मुलींना या अत्याचाराला सामोरे जावे लागेल, असा गंभीर प्रश्नही त्यांनी विचारला. अमित शहा यांच्या अखत्यारीतील दिल्ली पोलिस किंवा आदित्यनाथ यांच्या अखत्यारीतील उत्तर प्रदेश पोलिसांची काही जबाबदारी निश्चित होईल का? अजिबात नाही. या गुन्ह्यावरही नेहमीप्रमाणे फक्त पडदा टाकला जाईल असे ते म्हणाले.

-------

### 'एक्सपायरी'चा

विविध नामांकित कंपन्यांचे खाद्यपदार्थ तसेच इतर साहित्य असा एकूण ७५ लाख २१ हजार २६९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी तुर्भे पोलीस ठाण्यात अन्न सुरक्षा व मानके कायदा तसेच भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयप्रकाश संचतीराम सिंग (वय २७) आणि जया नवरंग बहादूर सिंग (वय २६) यांच्यासह संबंधित ११ निर्यातदार कंपन्यांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, खाद्यपदार्थांच्या मुदतवाढीसाठी पॅकेटवरील तारखांमध्ये अशा प्रकारे फेरफार होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास नवी मुंबई गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाकडून सुरू आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.०२ सप्टेंबर २०२६


## थोडक्यात



### शिक्षक भरतीत संतोष केदार यांनी यश संपादन केल्याबद्दल मातृभूमी कडून सन्मानित

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टलद्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेत संतोष बाजीराव केदार यांनी उज्वल यश संपादन करून त्यांची ठाणे आदिवासी विभागात माध्यमिक शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल राष्ट्रीय संत श्री भगवान बाबा यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजी मातृभूमी प्रतिष्ठान बीडच्या वतीने ज्ञानोबा मुंडे यांच्या हस्ते त्यांचा शाल पुष्पहार व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. संजय तांदळे, ज्ञानोबा मुंडे, लक्ष्मण चाटे,बाजीराव ढाकणे, जाणवळे सह पालकांची उपस्थिती होती.



### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांचा काल ५८ वा वाढदिवस बीड तालुका व शहर काँग्रेसच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

बीडचे ग्रामदैवत श्री शेत्र कंकालेश्वर मंदिर याठिकाणी महाभिषेक करुन हर्षवर्धन सपकाळ यांना राज्यातील जनतेच्या न्याय हक्कासाठी लढण्याचे बळ व निरोगी दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना करण्यात आली. त्याच बरोबर बीड शहरातील प्रसिद्ध असलेल्या मन्सूरशहा दर्गा याठिकाणी चादर चढवणे, वृक्षारोपण, फाळवाटप आदी कार्यक्रम करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, शहराध्यक्ष इलियास टेलर, जिल्हा सरचिटणीस मिलिंद मस्के, शेख सिराज पटेल, इंटक जिल्हाध्यक्ष रामधन जमले, असंघटित कामगार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संतोष निकाळजे, निराधार निरक्षित विभाग जिल्हाध्यक्ष शेख मोहसिन, बीड तालुका उपाध्यक्ष कादर बाबा इनामदार, युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष हनुमान घोडके, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख बबलु भाई, आपलसंख्यांक शहराध्यक्ष महमद खामरुद्दीन, जमील खान, अशोक शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### टीसी हरवला आहे

गौरव रामेश्वर पवार या नावाचा राजुरेश्वर विद्यालय कर्जत या शाळेचा इयत्ता १० वी पासचा टी सी कर्जत ते अंबड जालना बस प्रवासात हरवला आहे सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा. संपर्क: ९८३४३२१२१५

# दुष्काळाची चाहूल; महिनाभरापासून पावसाची दडी, पिके करपली

## सोयाबीनसह खरीप पिके संकटात; शेतकरी आर्थिक विवंचनेत, बाजारपेठाही ओस पडल्या

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

गेल्या महिनाभरापासून पावसाने पाठ फिरवल्याने युसूफवडगावसह केज तालुक्यातील अनेक भागांत खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. पावसाअभावी शेतातील सोयाबीनसह इतर पिके करपून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली असून, हातातोंडाशी आलेला घास डोळ्यादेखत हिरावून जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात मोठी चिंता निर्माण झाली आहे.

यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीला झालेल्या समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या केल्या. मात्र, पिके वाढीच्या आणि फुलोऱ्याच्या महत्त्वाच्या अवस्थेत असताना पावसाने अचानक दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने सोयाबीनची पाने पिवळी पडू लागली असून अनेक ठिकाणी पिके सुकून करपण्यास सुरुवात झाली आहे. इतर खरीप पिकांचीही अशीच अवस्था होताना दिसत आहे.

उसनवारी, उधारी आणि कर्जाचा बोजा

पेरणीसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी उसनवारी केली, काहींनी दुकानातून उधारीवर बियाणे, खते व औषधे घेतली, तर काहींनी व्याजाने पैसे काढून शेतीत गुंतवणूक केली. मात्र, आता पिकेच हातची जात असल्याने घेतलेले पैसे कसे फेडायचे, कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा आणि पुढील हंगामाची तयारी कशी करायची, असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. पिके वाचली तर कर्ज फेडण्याची आशा आहे; मात्र पाऊसच झाला नाही तर शेतीत केलेला खर्चही निघणार नाही, अशी व्यथा अनेक शेतकरी व्यक्त करीत आहेत.






**सणासुदीच्या काळात बाजारपेठेवरही परिणाम**

गणेशोत्सव, गौरी उत्सव यांसारखे सण जवळ आले असताना पावसाने ओढ दिल्याचा परिणाम ग्रामीण बाजारपेठेवरही जाणवू लागला आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने बाजारपेठेतील खरेदी-विक्रीवर परिणाम झाला असून दुकाने व बाजारपेठांमध्ये अपेक्षित वर्दळ दिसून येत नाही. शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मोठे चक्र अवलंबून असल्याने पिकांचे नुकसान झाल्यास त्याचा फटका व्यापारी, छोटे व्यावसायिक आणि मजूर वर्गालाही बसण्याची शक्यता आहे.

**पावसाकडे आभाळभरून नजरा**

एकीकडे पिके करपण्याच्या मार्गावर असताना दुसरीकडे शेतकरी अजूनही आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. एखादा दमदार पाऊस झाला तर उरलेली पिके वाचण्याची शक्यता आहे. मात्र, पावसाची प्रतीक्षा दिवसेंदिवस लांबत चालल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढत आहे. पावसाअभावी शेतीचे आर्थिक गणितच कोलमडण्याची शक्यता निर्माण झाली असून, पाऊस पडला नाही तर पुढे काय? हा प्रश्न शेतकऱ्यांसह संपूर्ण ग्रामीण भागाला सतावत आहे. शासनाने परिस्थितीची तातडीने पाहणी करून पिकांची वस्तुनिष्ठ पाहणी, पंचनामे करून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत व दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.पाऊस हा केवळ शेतकऱ्यांच्या पिकांचा आधार नसून संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे आता सर्वांच्या नजरा आभाळाकडे लागल्या असून, वरुणराजाने कृपा करावी, अशीच प्रार्थना शेतकरी करीत आहेत.

# सहस्त्र दीपांच्या तेजात व कमलार्चनात तेजोमय झाले सिद्धेश्वर; तिसऱ्या श्रावणी सोमवारी भक्तीचा अलौकिक सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगावचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिर येथे श्रावण मास उत्सवानिमित्त तिसऱ्या श्रावणी सोमवारी विविध धार्मिक व भक्तिमय कार्यक्रमांनी शिवभक्तीचा अलौकिक सोहळा संपन्न झाला. सहस्त्र कमलार्चन, सहस्त्र दीप अलंकार सेवा, अखंड रुद्राभिषेक, मंत्रजप, शिवलीलामृत पारायण तसेच सांप्रदायिक कीर्तनामुळे श्री सिद्धेश्वर मंदिर परिसर दिवसभर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

श्रावण मास उत्सवानिमित्त श्री सिद्धेश्वरांना सहस्त्र कमलार्चन अर्पण करण्यात आले. त्याचबरोबर सहस्त्र दीप अलंकार सेवा साकारण्यात आली. असंख्य दीपांच्या तेजाने मंदिर परिसर उजळून निघाला असून, कमलपुष्पांच्या आरासीत श्री सिद्धेश्वरांचे रूप अधिकच तेजोमय दिसत होते.

यावेळी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत अखंड रुद्राभिषेक करण्यात आला. तसेच 'श्री शिवाय नमस्तुभ्यम' या मंत्राचा तब्बल एक लाख जप करण्यात आला. सुकाणू समितीच्या सदस्यांच्या वतीने ११व्या शिवलीलामृत पारायणाचे १०१



पारायण करण्यात आले.

माजलगावचे भूमिपुत्र व सुकाणू समितीचे सदस्य ह. भ. प. मल्हार महाराज शेळगावकर यांच्या मधुर वाणीत सांप्रदायिक कीर्तन सेवा संपन्न झाली. त्यांच्या रसाळ वाणीतून उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. कीर्तन सेवेमुळे मंदिर परिसरात भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाची सांगता महाशृंगार आरतीने करण्यात आली. त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तिसरा श्रावणी सोमवार आणि संकष्टी चतुर्थीचा योग एकाच दिवशी आल्याने हजारो भाविकांनी दिवसभर उपवास करून श्री सिद्धेश्वरांचे दर्शन घेतले. महाशृंगार आरतीनंतर महाप्रसाद ग्रहण करून हजारो भाविकांनी आपला उपवास सोडला. या भक्तिमय सोहळ्यास हजारो भाविकांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली. दिवसभर श्री सिद्धेश्वर मंदिर परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेला. या संपूर्ण धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी सुकाणू समिती श्री सिद्धेश्वर भक्त मंडळाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. नियोजनबद्ध आयोजन, धार्मिक विधींची व्यवस्था आणि भाविकांच्या सेवेसाठी मंडळाच्या सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

## पान ६ वरुन...

### पात्रुडच्या महामार्गावरील अतिक्रमणांमुळे

लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. प्रसंगी रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा समन्वयक विजयदादा साळवे यांच्यासह वशिस्ट लांडगे अंजेराम घनघाव वैजनाथ गडशिंग विशाल ससाने गंगाधर सोनपसारे धम्मा गावडे आशोक जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी माजलगाव, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक तसेच माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे यांना देण्यात आल्या असून आता प्रशासन या तक्रारीची दखल घेऊन महामार्गावरील अतिक्रमणे, सुरक्षाव्यवस्था आणि खराब रस्त्यामुळे अपघाताचा वाढता धोका याबाबत कोणती पावले उचलते, याकडे पात्रुडसह तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. नागरिकांच्या जीविताची सुरक्षा हीच खरी प्राथमिकता असल्याने, एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने महामार्गावरील धोकादायक अतिक्रमणांवर हातोडा चालवावा, व माजलगाव तेलगाव रस्त्याची दुरवस्था तात्काळ मिटवावी अशी अपेक्षा सय्यद अन्वर यांनी व्यक्त केली आहे.

### शेतकऱ्यांच्या सुविधांसाठी बाजार

भवनामुळे बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांना निवास, बैठक व विविध कामांसाठी सुविधा उपलब्ध होणार असून, रस्त्याच्या कामामुळे बाजार समितीतील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. प्रास्ताविकात सभापती जयदत्त नरवडे यांनी बाजार समिती शेतकरी हितासाठी केलेल्या अनेक विकास कामांची माहिती दिली.

सूत्रसंचालन सिद्धेश्वर येवले यांनी केले तर आभार संचालक डॉ. उद्धव नाईकनवरे यांनी मानले.यावेळी बाजार समितीचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी उपस्थित होते.

### एलसीबीची मोठी कारवाई

हिदायत (वय २९) सय्यद शफाखत अली सय्यद खाजा (वय ३२) सय्यद अस्लम सय्यद सादेक (वय ३२, सर्व रा. सायगाव, ता. अंबाजोगाई) पोलिसांनी घटनास्थळावरून जुगाराचे साहित्य आणि रोख रक्कम असा एकूण १,०१,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सादोळा शिवारात गोदावरी पात्रातून अवैध वाळू उपसा; ट्रॅक्टर जप्त दुसऱ्या एका कारवाईत, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सादोळा गावातील 'थडी' शेतशिवारात गोदावरी नदीपात्रातून केनीच्या साहाय्याने अवैध वाळू उपसा केला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पथकाने छापा मारून कारवाई करत एका इसमाला ट्रॅक्टर व लोखंडी केनीच्या साहाय्याने वाळू उपसा करताना ताब्यात घेतले. घटनास्थळावरून ५ लाख रुपये किमतीचे स्वराज कंपनीचे ट्रॅक्टर व लोखंडी केनी जप्त करण्यात आली असून, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर धडक कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक (अंबाजोगाई) चेतना तिडके, सहा. पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक अंनत्रे, आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पोउपनि सुशांत सुतळे, पोउपनि महेश विघ्ने यांच्यासह मारोती कांबळे, सचिन सानप, रामचंद्र केकान, गोविंद भताने, सचिन आंधळे, अतुल हराळे, महेश जोगदंड, बप्पा घोडके, दिलीप गिते आणि गणेश मराडे यांनी ही कामगिरी यशस्वीरित्या पार पाडली.

### गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर

रात्रीच्या वेळी नागरिकांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षिततेचा विचार करून नगर परिषदेने तातडीने किमान २५०० नवीन पथदिवे खरेदी करावेत आणि गणेशोत्सव मंडळे असलेल्या प्रमुख मार्गांवर व चौकांमध्ये हे पथदिवे तातडीने बसवून ते कार्यान्वित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांच्यासह गणेश वाघमारे, संजय उडाण, राणा चव्हाण, शुभम धूत, ॲड.नागेश तांबारे, राहुल गुरखुदे, मुस्तफा सय्यद, मुन्ना गायकवाड, नंदकिशोर पिंगळे, नितीन साखरे, मंगेश धोंगडे, ॲड.गोविंद शिराळे, आदित्य माने, अमोल पौळ, किरण बेद्रे, विशाल राऊत, शिवराज शिरसाट, मिलिंद ठोकळ आदींची उपस्थिती होती.

**खड्डेमय रस्त्यांवर मुरूम टाकण्याची मागणी**

शहरातील अनेक रस्त्यांची अवस्था खराब असून ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. गणेशोत्सवापूर्वी नागरिकांना आणि गणेशभक्तांना सुरक्षितपणे ये-जा करता यावी यासाठी आवश्यक ठिकाणी तातडीने मुरूम टाकून रस्ते वाहतुकीयोग्य करावेत, अशी मागणीही करण्यात आली.

**भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा**

बीड शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित नियमांचे पालन करून भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

### बिंदुसरा काठावरील

या परिसरात दुर्गंधी सुटून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येते.या सर्व बाबींकडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून नेमका रस्ता कशासाठी केला? असा प्रश्न नागरिकांच्या मनात येतो. हा रस्ता खडीकरण ,आणी डांबरीकरण झाला तर पर्यायी मार्ग होऊ शकतो मात्र याचे कोणाला सोयरसुतक असलेले दिसत नाही. या परिसरातील नगरसेवकांनी याकडे लक्ष देऊन या रस्त्याचे काम पूर्ण करून घ्यावे अशी मागणी सातत्याने होत आहे. केवळ श्रेयवादासाठी हा रस्ता होत नाही अशी चर्चा परिसरात चालू आहे. नागरिकांना याचे काही देणे घेणे नसून त्यांना रस्ता हवा आहे. रस्ता झाला तर पर्यायी मार्ग उपलब्ध होऊन मोंढ्याकडे जाणाऱ्या लोकांना सोयीचे होईल. किंवा ज्यांना मोंढ्याकडून सुभाष रोडला यायचे आहे त्यांच्यासाठी हा जवळचा मार्ग असेल. परंतु रस्ता होत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

# इनाम जमीन हक्कासाठी ३ सप्टेंबरला बीडमध्ये आंदोलन

## दशनाम गोसावीसह देवस्थान पुजारी समाज एकवटणार !- हरी गिरी

माजलगाव । प्रतिनिधी

राज्यातील इनाम व देवस्थान इनाम जमिनींच्या हक्कासाठी दशनाम गोसावी इनाम जमीन हक्क परिषद, महाराष्ट्र राज्य व देवस्थान इनाम जमीन कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर एकाच दिवशी हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

बीड येथील आंदोलनाचे नेतृत्व भटके-विमुक्त दशनाम गोसावी संघ, महाराष्ट्र राज्याचे राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी तसेच मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र बन यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येणार आहे.



या आंदोलनात दशनाम गोसावी समाजासह सकल गुरव, ब्राह्मण, गोंधळी, घडसी, कोळी, बैरागी तसेच विविध देवस्थानांचे पुजारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. इनाम व देवस्थान जमिनींच्या हक्कासाठी शासनाने ठोस निर्णय घेऊन संबंधित समाजाला न्याय द्यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

'आपली जमीन, आपला हक्क; एकजुटीने लढू, जमीन हक्क मिळवून घेऊ' असा निर्धार या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून इनाम जमिनींच्या प्रश्नाला सामोरे जाणाऱ्या समाजबांधवांनी आपल्या हक्कासाठी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील दशनाम गोसावी समाज, सकल गुरव, ब्राह्मण, गोंधळी, घडसी, कोळी, बैरागी व इतर देवस्थान इनाम पुजाऱ्यांनी दि. ३ सप्टेंबर रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालय येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपले एकीचे बळ दाखवावे, असे आवाहन मानव विकास संस्था, शेलापुरीचे अध्यक्ष तथा नागराज बांधकाम तंत्र हस्तकला अध्यापक विद्यालयाचे हरी गिरी आणि दशनाम गोसावी समाज परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष भास्कर गिरी, प्रा. लक्ष्मण गिरी, प्रा. तात्या पुरी, नायब तहसीलदार शिवाजी गिरी, अशोक गिरी गुदेकर, दशनाम गोसावी समाज परिषदेचे युवा कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर गिरी, बाजीराव गिरी, आसाराम गिरी, संजीव भारती, रवी बन, दत्ता गिरी, माजलगावचे डिगंबर गिरी, सुधाकर भारती, गणेश गिरी, भीमाशंकर गिरी, संतोष पुरी व पंकज पुरी यांनी केले आहे.

# पाटोदा शहरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात अवैध धंद्यांनी पुन्हा डोके वर काढल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असून, शहरातील विविध भागात दिवसाढवळ्या ऑनलाइन चक्री (गुडगुडी)चे खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. बागरवाडी फाटा, नगररोड, माजरसुंबा रोड, ग्रामीण रुग्णालयाच्या पाठीमागील परिसर तसेच सुतार गल्ली पुढील भागात हे प्रकार सुरू असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, हे प्रकार कथितरित्या उघडपणे सुरू असतानाही संबंधित यंत्रणा काय भूमिका घेत आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. 'पोलीस प्रशासनाला याची माहिती नाही की माहिती असूनही दुर्लक्ष केले जात आहे?' असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

पाटोदा शहरात काही व्यक्ती बाहेरील भुम तालुक्यांतून येऊन कथितरित्या अवैध व्यवसाय सुरू करत असल्याचीही नागरिकांमध्ये चर्चा आहे. त्यामुळे शहरातील कायदा-सुव्यवस्था आणि तरुण पिढीच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. ऑनलाइन चक्री, जुगारसदृश प्रकार आणि इतर अवैध व्यवसायांमुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवू शकते. त्यामुळे अशा प्रकारांना वेळीच आळा घालण्याची गरज आहे.

'दिवसा ढवळ्या धंदे सुरू असतील तर कारवाई कुठे?'

शहरातील नागरिकांचा प्रश्न साधा आहे-अवैध धंदे खरंच सुरू असतील तर त्यांच्यावर कारवाई का होत नाही? संबंधित ठिकाणांची गोपनीय पद्धतीने चौकशी करून सत्यता पडताळावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पाटोदा पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाची तातडीने दखल घेऊन बागरवाडी फाटा, नगररोड, माजरसुंबा रोड, ग्रामीण रुग्णालय परिसर आणि सुतार गल्ली भागातील कथित अवैध धंद्यांची तपासणी करावी. कारवाई केवळ कागदावर नको; प्रत्यक्षात अवैध धंद्यांना आळा बसला पाहिजे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित पोलीस प्रशासनाची अधिकृत भूमिका समोर आलेली नाही. त्यामुळे पोलिसांच्या चौकशीनंतरच या प्रकारातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे

# डॉ.राजेश इंगोले यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी जल्लोषात साजरा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ तथा इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छांचा सोहळा न करता सामाजिक बांधिलकी जपत विविध विधायक उपक्रम राबविण्यात आले.

सकाळी दहा वाजता मित्रपरिवार, हितचिंतक व शुभचिंतकांच्या वतीने डॉ.राजेश इंगोले यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. त्यानंतर बालाघाटच्या डोंगररांगेतील बुट्टेनाथ परिसरात वड व पिंपळाची सुमारे ५० रोपे लावून वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. तसेच अंध व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळांमध्ये गणवेश व मिठाईचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून गरजू विद्यार्थ्यांना मोफत औषधोपचार करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक





साहित्याचे वाटप करण्यात आले. वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळविणाऱ्या अंबाजोगाईतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यासोबतच मोतीबिंदू निदान शिबिराचे आयोजन करून गरजू नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली. दरम्यान, डॉ.राजेश इंगोले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासून त्यांच्या समाधान रूग्णालयात मित्रपरिवार, हितचिंतक व विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठी गर्दी झाली होती. राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, शैक्षणिक, कला-क्रीडा आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून त्यांचे अभिष्टचिंतन केले. सकाळी दहापासून रात्री दहापर्यंत शुभेच्छांचा हा सिलसिला सुरू होता.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान : वैद्यकीय सेवा, सामाजिक कार्य, शैक्षणिक व सामाजिक प्रबोधन, गायन-कला तसेच क्रीडा क्षेत्रातही डॉ.राजेश इंगोले यांनी आपला ठसा उमटविला आहे. अंबाजोगाई नगरपरिषदेत नगरसेवक तसेच शिक्षण सभापती म्हणून कार्यरत असताना त्यांनी केलेल्या विविध विकासात्मक व सामाजिक कामांची नागरिक आजही आठवणीने चर्चा करतात. मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ म्हणून डॉ.इंगोले यांचे कार्य अंबाजोगाईच्या लौकिकात भर घालणारे ठरले आहे. महाराष्ट्रासह कर्नाटक व तेलंगणातील विविध भागांतून मानसिक आरोग्य व व्यसनमुक्तीच्या मार्गदर्शनासाठी नागरिक त्यांच्याकडे येतात. सर्वसामान्यांच्या आरोग्याच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवत आरोग्य सुविधा अधिक सक्षम व्हाव्यात यासाठी प्रशासनाशीही पाठपुरावा केला आहे. विविध सामाजिक प्रश्नांवर त्यांनी घेतलेली परखड आणि स्पष्ट भूमिका अनेकांना भावते. अन्यायग्रस्तांच्या बाजूने उभे राहत त्यांनी सामाजिक प्रश्नांवर वेळोवेळी आवाज उठविला आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या माध्यमातून डॉक्टरांच्या विविध प्रश्नांसाठीही त्यांनी सक्रिय भूमिका बजावली असून, विविध आंदोलनांत सहभाग घेतला आहे.

**कोरोना काळातील 'ऑक्सिगाणं' उपक्रमाचीही दखल :**

कोरोना महामारीच्या कठीण काळात डॉ.इंगोले यांनी ऑक्सिगाणं या संगीत रजनी - आर्केस्ट्राच्या माध्यमातून कोरोनाग्रस्त रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांना संगीत आणि गाण्यांच्या माध्यमातून मानसिक आधार देण्याचा प्रयत्न केला. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे राज्यभर कौतुक झाले. गायक व कलाकार म्हणूनही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या महाराष्ट्र राज्य वैद्यकीय कक्षाचे प्रमुख म्हणून कार्य करताना त्यांनी पत्रकार बांधवांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन केले. पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेणारा हा उपक्रम राज्य पातळीवर कौतुकास पात्र ठरला.

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी 'सुभाष चंद्रा कर्जमाफी मॉडेल' लागू करा!

## भांडवलदारधार्जिण्या सरकारच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने; बीडमध्ये सात महिन्यांत १२३ शेतकरी आत्महत्या-डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून, १ जानेवारी ते ३१ जुलै २०२६ या सात महिन्यांत १२३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे. सततची नापिकी, ओला व कोरडा दुष्काळ, हवामानातील अनिश्चितता आणि वाढत्या कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी देताना विविध जाचक नियम व अटी लावल्या जातात; मात्र मोठ्या उद्योगपतींच्या कर्जप्रकरणांमध्ये सवलती दिल्या जात असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांसाठीही कर्जमाफीचे स्वतंत्र धोरण लागू करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली.**



उद्योगपती सुभाष चंद्रा यांच्या कर्जप्रकरणातील कथित सेटलमेंटचा दाखला देत, त्याच धर्तीवर शेतकऱ्यांसाठी 'सुभाष चंद्रा कर्जमाफी मॉडेल' लागू करावे, अशी मागणी करण्यात आली. यासोबतच बीड जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून सरसकट कर्जमाफी करावी, अतिवृष्टीचे अनुदान तातडीने देण्यात यावे अशीही मागणी आहे.

या मागण्यांसाठी डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी सरसकट कर्जमाफी करा', 'भांडवलदारधार्जिण्या सरकारचा धिक्कार असो', 'कोरडा दुष्काळ जाहीर करा' अशा घोषणा देण्यात आल्या. जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांना निवेदन देण्यात आले. या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, मुबीन शेख , बाळासाहेब मोरे पाटील (शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष), किष्किंधा पांचाळ (जिल्हाध्यक्ष विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज बीड), सादेक सय्यद (शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक बीड), सामाजिक कार्यकर्ते भीमराव कुटे, हनुमान घोडके, लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे, प्राचार्य डी.जी. तांदळे (मार्गदर्शक किसान सभा बीड), ज्येष्ठ समाजसेवक इक्बाल पेंटर, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, शेतकरी हक्क आंदोलनाचे राजेंद्र आमटे, प्रविण आनेराव, शेषेराव वीर, जयसिंगराजे वीर, सिद्धार्थ डोळस, सरफराज खान आदी सहभागी झाले.

### साडेसात लाख हेक्टर खरीप क्षेत्र

बीड जिल्ह्यात साडेसात लाख हेक्टरहून अधिक खरीप क्षेत्र असून, बहुतांश शेती पावसाच्या भरवशावर आहे. अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, रोग-किडींचा प्रादुर्भाव आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

### 'कर्जाच्या जोखडातून शेतकऱ्यांना मुक्त करा'

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केवळ आश्वासनांपेक्षा सरसकट कर्जमाफी, प्रभावी पीक विमा, नैसर्गिक आपत्तीची तातडीची नुकसान भरपाई आणि उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव आवश्यक आहे. सरकारने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली.

---

# कोंबड्यांना येणारा ताण कारणे आणि त्यावरील उपाय!

अंतर्गत शारीरिक कार्य सामान्यपणे करण्यासाठी कोंबड्या विविध वर्तणूक आणि चयापचय यंत्रणा वापरते, यालाच कोंबड्यातील ''ताण'' असे म्हणतात. व्यावसायिक कोंबडी पालनातील कोंबड्यांना अशा परिस्थितीचा सामना करावा लागतो. कोंबडीच्या ताणाचा कळपाच्या एकूण आरोग्यावर आणि उत्पादकतेवर लक्षणीय परिणाम होतो. त्यामुळे तणाव निर्माण करणारे घटक समजून घेणे गरजेचे आहे. हे घटक ओळखणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे हा यशस्वी पोल्ट्री उत्पादनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. अचानक हवामानातील बदलामुळे कोंबड्यांना ताण येऊ शकतो आणि प्रतिकारशक्ती कमकुवत होऊ शकते आणि ते संवेदनशील बनतात. वेगवेगळ्या कारणांमुळे कोंबड्या पुरेशा प्रमाणात आहार घेत नसतील तर ताण येऊ शकतो. खाद्य, आहारात पुरेशा पोषक तत्वांचा अभाव किंवा इतर घटक यामुळे सुद्धा ताण येतो. वजन वाढणे, कमी होणे किंवा वृद्धत्व यासारख्या घटनांमुळे तणाव निर्माण होतो. कोंबड्यांना पकडताना, विशिष्ट औषधे देताना किंवा एका ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी नेले जाते, तेव्हा त्यांना भावनिक ताण येतो. रोग बरा करण्यासाठी दिलेल्या औषधांमुळे आणि कालावधीमुळे देखील ताण येऊ शकतो. कोंबड्यांमधील ताण घालवण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी प्रत्येक कोंबडीला किती जागा लागते हे पाहून आपल्याजवळील उपलब्ध जागेनुसार एकूण कोंबड्यांची संख्या ठरवावी. तुमच्याकडे उपलब्ध असलेल्या जागेच्या आधारे कोंबडीची एकूण संख्या निश्चित करा. लहान जागेत जास्त गर्दी केल्याने वातावरणातील अमोनियाचे प्रमाण वाढते. शिवाय पक्षी एकमेकांच्या सानिध्यात असल्याने रोगाचा प्रादुर्भाव लवकर होतो. यावर उपाय म्हणून लिटरची स्वच्छता करावी. पावसाळ्यात आणि जास्त आर्द्रता असताना लिटर कोरडे ठेवावे. वातावरणातील बदलानुसार शेडमध्ये पडदे लावणे, पोती बांधणे या गोष्टींची वेळेवर काळजी घ्यावी. ताण घालवणारे औषधे तज्ज्ञांच्या सल्ल्याने द्यावीत. आहारातून किंवा पाण्यातून जीवनसत्वांचा पुरवठा केल्यास ताण कमी होतो. कोंबड्यांना ताण असताना त्यांना लसीकरण करू नये. प्रथम कोंबड्यांवरील ताण कमी करावा आणि नंतरच लसीकरण करावे.

---

# नाबार्ड आणि हवामान विभागाचा महत्त्वपूर्ण करार; शेतकऱ्यांना मिळणार अचूक हवामान माहिती

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**शेतकऱ्यांना अचूक हवामानाची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) आणि भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) सामंजस्य करार केला. या करारानुसार नाबार्ड आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या या डिजिटल व्यासपीठावर हवामानविषयक माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे.**

देशभरातील शेतकरी, बँका व वित्तसंस्था, धोरणकर्ते तसेच अभ्यासक-संशोधक यांना हवामानाची माहिती विनामूल्य आणि सहज उपलब्ध करून देणे, हे या कराराचे मुख्य उद्दिष्ट आहे. यासाठी आयएमडी हवामान अंदाज, कृषीविषयक हवामान सल्ला, धोक्याचे इशारे आणि प्रत्यक्ष निरीक्षणाधारित नोंदी पोर्टलला पुरवेल. त्यानंतर या माहितीचा प्रसार नाबार्ड आपल्या वेब पोर्टल, मोबाइल ॲप आणि खुल्या एपीआय सुविधेमार्फत देशभरातील शेतकरी व इतर वापरकर्त्यांपर्यंत पोहोचवणार आहे. नाबार्डचे अध्यक्ष डॉ. शाजी कृष्णन व्ही. यांनी सांगितले की, विकास आणि आर्थिक निर्णय घेताना हवामानाचा शेतीवर होणारा परिणाम लक्षात घेणे गरजेचे आहे. हवामानाची माहिती शेतकऱ्यांना वेळेवर मिळाली आणि तिचा योग्य वापर करता आला, तर त्यांना चांगले निर्णय घेण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. तर, आयएमडीचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी हवामानाचा अंदाज आता अधिक अचूक झाला आहे. मात्र, हा अंदाज स्थानिक पातळीवरील शेतकऱ्यांपर्यंत वेळेत आणि सोप्या भाषेत पद्धतीने पोहोचवणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, नाबार्डच्या हवामान कृती आणि शाश्वतता विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक संजीव डी. रोहिल्ला आणि आयएमडीचे वैज्ञानिक तसेच मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राचे प्रमुख बिक्रम सिंह यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या प्रसंगी नाबार्डचे अध्यक्ष डॉ. शाजी कृष्णन व्ही., आयएमडीचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा, तसेच दोन्ही संस्थांचे वरिष्ठ अधिकारी आणि भागीदार संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना पेरणीची वेळ ठरविणे, सिंचनाचे नियोजन करणे, फवारणी करणे, खत व्यवस्थापन करणे, काढणीची वेळ निश्चित करणे आणि हवामानाशी संबंधित नुकसान टाळण्यासाठी पूर्वतयारी करणे सोपे होणार आहे.



### पोर्टलवर कोणती माहिती मिळणार?

हवामानाचा अंदाज, वीज कोसळण्याची व अतिवृष्टीची पूर्वसूचना. शेतजमिनीतील ओलाव्याचे प्रमाण. पिके आणि वनस्पतींची सद्यस्थिती. हवामान बदलाचे संभाव्य परिणाम.

---

# ब्लॉच रोग : हळदीची पाने पिवळी पडण्याची कारणे



**पावसाळ्यातील दमट हवामान, पानांवर दीर्घकाळ टिकणारा ओलावा आणि शेतातील अपुरा निचरा यामुळे हळद पिकावर ब्लॉच आणि ठिपका या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. पानांवर पिवळसर किंवा तपकिरी ठिपके दिसणे, त्यानंतर मोठे चट्टे तयार होणे आणि पाने वाळणे अशी या रोगांची प्रमुख लक्षणे आहेत.**

हळद पिकाची चांगली वाढ आणि उत्पादनासाठी हिरवीगार, निरोगी पाने महत्त्वाची असतात. मात्र पावसाळ्यातील दमट हवामान, पानांवर दीर्घकाळ टिकून राहणारा ओलावा, दाट लागवड आणि शेतात साचणारे पाणी यामुळे हळदीवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढू शकतो. विशेषतः ब्लॉच आणि ठिपका रोगामुळे पानांचा हिरवा भाग कमी होऊन प्रकाशसंश्लेषणाची प्रक्रिया प्रभावित होते. परिणामी गड्ड्यांची वाढ खुंटून उत्पादनात घट होण्याची शक्यता असते. त्यामुळे सुरुवातीच्या लक्षणांची ओळख करून वेळेत उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**ब्लॉच रोगाची सुरुवात :**

हळदीवरील ब्लॉच रोग या बुरशीमुळे होतो. ही बुरशी रोगट पाने तसेच शेतात राहिलेल्या पिकांच्या अवशेषांमध्ये टिकून राहू शकते. पावसाळ्यातील जास्त आर्द्रता, पानांवर सतत राहणारा ओलावा, वारंवार पडणारा पाऊस, ढगाळ वातावरण, दाट लागवड आणि शेतातील अपुरा निचरा या परिस्थिती रोगाच्या वाढीस पोषक ठरतात. पानांवर अनेक तास पाणी किंवा ओलावा टिकून राहिल्यास बुरशीची वाढ आणि संसर्ग वेगाने होऊ शकतो. अतिसावलीमुळे पिकातील हवा खेळती राहत नाही आणि पाने सुकण्यास अधिक वेळ लागतो. त्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. पावसाचे तुषार आणि पाण्याच्या थेंबांमधूनही रोग एका पानावरून दुसऱ्या पानावर पसरण्यास मदत होते.

**पानांवर पिवळे ठिपके दिसताच लक्ष द्या :**

ब्लॉच रोगाची सुरुवात पानांवर लहान फिकट पिवळ्या ठिपक्यांपासून होते. काही दिवसांनी हे ठिपके तांबूस-तपकिरी किंवा गडद तपकिरी रंगाचे होतात. पुढे अनेक ठिपके एकमेकांत मिसळून मोठे आणि अनियमित आकाराचे चट्टे तयार होतात. रोगाची तीव्रता वाढल्यास पाने पिवळी पडून करपल्यासारखी दिसतात. प्रादुर्भाव अधिक झाल्यास पाने अकाली वाळू शकतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी पानांवर दिसणाऱ्या सुरुवातीच्या ठिपक्यांकडे दुर्लक्ष न करता त्वरित पाहणी करणे गरजेचे आहे.

**ब्लॉच रोगाची लक्षणांची क्रमवारी :**

पिवळसर ठिपके ठिपके मोठे होणे, ठिपके एकत्र येणे तांबूस-तपकिरी चट्टे पाने पिवळी पडणे, पाने वाळणे.

**ठिपका रोगाचीही घ्या काळजी :**

हळदीवरील दुसरा महत्त्वाचा बुरशीजन्य रोग म्हणजे पानावरील ठिपका रोग. हा रोग या बुरशीमुळे होतो. ही बुरशी रोगट पाने आणि शेतातील पिकांच्या अवशेषांमध्ये जिवंत राहू शकते. उष्ण आणि दमट हवामान, जास्त आर्द्रता, पानांवर दीर्घकाळ टिकणारा ओलावा, वारंवार पाऊस, दाट लागवड, अतिसावली आणि शेतातील पाण्याचा अपुरा निचरा या परिस्थितीत या रोगाचा प्रादुर्भाव वाढू शकतो. पावसाचे किंवा सिंचनाचे पाणी पानांवर साचून राहिल्यास आणि पाने लवकर न वाळल्यास बुरशीचे बीजाणू अंकुरण्यास व पानांमध्ये प्रवेश करण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण होते. उष्णतेसोबत आर्द्रता जास्त असल्यास रोगाचा प्रसार वेगाने होऊ शकतो.

**निरोगी हळद पिकासाठी पंचसूत्री :**

निरोगी बेणे + योग्य वाण + स्वच्छ शेत + चांगला निचरा + पुरेशी हवा आणि कमी सावली यामुळे हळदीचे पीक निरोगी ठेवण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे पावसाळ्यात रोगाचा प्रादुर्भाव वाढण्यापूर्वीच शेतकऱ्यांनी पिकाची नियमित पाहणी करून आवश्यक व्यवस्थापन करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

---

# दुष्काळात पिके जगविण्यांसाठी करा असे उपाय



**सध्या पाऊस कमी आहे. अनेक भागातील पिके वाळून चालली आहेत. अशा परिस्थितीत सोयाबीन, कपाशी आणि तूर ही महत्त्वाची पिके वाचवणे कठीण झाले आहे. परंतु संरक्षित सिंचन, पालाशयुक्त खतांच्या फवारण्या, आंतरमशागत, मुलस्थानी जलसंधारण, आणि आच्छादन या उपायांनी आपण पावसाच्या खंड काळात पिके वाचवू शकतो.**

**सोयाबीनवरील फवारण्या :** सोयाबीनचे पीक सध्या वाढीच्या, फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहे. अशा अवस्थेत पिकाला पाणी मिळाले नाही तर पीक वाळते आणि उत्पादनावर परिणाम होतो. त्यामुळे पिके वाळताना दिसताच संरक्षित सिंचन द्यावे. संरक्षित सिंचन देणे शक्य नसेल तर पिकाला १३:०:४५ या विद्राव्य खताची १० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. सोयाबीन शेंगा भरण्याच्या अवस्थेत असेल तर पिकाला ०:०:५० या खताची ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी, असा सल्ला कसबे डिग्रज येथील कृषि संशोधन केंद्रातील सहायक प्राध्यापक डॉ. सचिन महाजन यांनी दिली आहे.

**कपाशीवरील फवारण्या :** कपाशीचे पीक सध्या पाते लागण्याच्या, फुलोरा आणि बोंड लागण्याच्या अवस्थेत आहे. अशा अवस्थेत पाण्याचा ताण पडला की पीक वाळायला लागते. त्यामुळे फुलोरा अवस्थेत पिकाला १३:०:४५ या खताची २० ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात फवारणी करावी. परंतु पीक जर बोंड लागण्याच्या अवस्थेत असेल पिकावर ०:०:५० या विद्राव्य खताची १० ग्रॅम प्रति लिटर पाणी फवारणी करावी.

**तुरीवरील फवारणी आणि केओलिनचा फायदा :** तुरीचे पीक सध्या वाढीच्या आणि शेंडा खुडणीच्या अवस्थेत आहे. अशा अवस्थेत पिकामध्ये १३:०:४५ याची १० ग्रॅम प्रति लिटर फवारणी करावी. शक्य असल्यास शेतकऱ्यांनी तिन्ही पिकांवर केओलिनची ६ टक्के म्हणजे ६० ग्रॅम प्रति लिटर पाणी अशी फवारणी करावी. यामुळे पिकावर पांढरा थर तयार होतो. या थरामुळे पानांवर असलेली छिद्रे बंद होतात, बाष्पोत्सर्जन कमी होते आणि पीक कमी पाण्यात तग धरते.

**पीक जगवण्यासाठीचे उपाय :** येत्या सप्टेंबरमध्येही पाऊस कमी राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे त्याचे नियोजन आत्ताच करणे आवश्यक आहे. यामध्ये परतीच्या पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरवावा. त्यासाठी मूलस्थानी जलसंधारणावर भर द्यावा. दोन ओळींमध्ये जास्त अंतर असलेल्या पिकांमध्ये सऱ्या पाडून घ्याव्यात. कपाशी आणि तूर या पिकांमध्ये आंतरमशागत करावी. कोळपणीमुळे मातीमधील भेगा बुजतात. त्यामुळे जमिनीतील बाष्पीभवन थांबते, ओलावा जास्त काळ टिकतो. माती भुसभुशीत होऊन मातीला आणि पिकांना ऑक्सिजन मिळतो. याशिवाय पिकाला शक्य असेल तर आच्छादन करावे. आच्छादनामुळे जमिनीतील ओलावा टिकतो तसेच तणांची वाढही रोखली जाते, असा सल्ला नांदेडच्या कापूस संशोधन केंद्रातील कृषिविद्यावेत्ता डॉ. अरविंद पांडागळे यांनी दिला आहे.

**पालाशयुक्त खतांची गरज का?**

वनस्पतीच्या पानांवरील छिद्र्यांमधून पाणी हवेमध्ये जाऊन त्याची वाफ होत असते, याला बाष्पोत्सर्जन म्हणतात. प्रत्येक झाडामध्ये ही क्रिया कायम चालू असते. परंतु मुळांमधून पिकाला पाणी मिळत नसेल तर बाष्पोत्सर्जनामुळे पिके वाळून जातात. पालाश हा पानांवरील बाष्पोत्सर्जन करणाऱ्या छिद्र्यांची उघडझाप करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. १३:०:४५ आणि ०:०:५० या दोन्ही खतांमध्ये पालाशचे प्रमाण जास्त आहे. त्याची फवारणी पिकावर केली की पानांवरील छिद्रे बंद होऊन त्यातून होणारी पाण्याची वाफ थांबते आणि पीक कमी पाण्यात तग धरुन उभे राहते.

---

# केळीवरील 'काळी बोंडी कूज' रोगाचे वेळीच करा नियंत्रण!

**केळी पिकावरील जळका चिरूट ज्याला आपण काळी बोंडी कूज' म्हणून सुद्धा ओळखतो. हा रोग तीन ते चार वर्षांपूर्वी कमी घातक रोग म्हणून ओळखला जायचा. परंतु काही काळापासून हा एक महत्त्वाचा रोग म्हणून उदयास येत आहे ज्याचे मुख्य कारण म्हणजे वातावरणातील अति आर्द्रता. सिगार ॲन्ड रॉट हा केळीच्या फळांचा प्रमुख रोग आहे. हा रोग प्रामुख्याने ट्रॅचिस्फेरा फ्रुक्टिजेना या बुरशीमुळे होते आणि काही वेळा व्हर्टिसिलियम थियोब्रोमामुळे देखील होते.**

**रोगाचा प्रसार :** हा रोग वारा किंवा पावसामुळे पसरतो. पावसाळ्यात केळीच्या फुलांच्या अवस्थेत निरोगी उतींवर बुरशीचा हल्ला होतो. ते फुला द्वारे केळीला संक्रमित करते. तेथून पुढे ते फळांच्या टोकापर्यंत पसरते आणि कोरड्या कुजेला कारणीभूत ठरते जे राखेसारखे दिसते आणि सिगारसारखे दिसते, ज्यामुळे रोगाला सिगार ॲन्ड रॉट असे नाव दिले जाते. स्टोरेजमध्ये किंवा वाहतुकी दरम्यान या रोगाचा प्रसार संपूर्ण फळांवर होतो

**रोगाची लक्षणे :** हा रोग फळांच्या टोकांवर येत असून टोके कोरड्या, तपकिरी ते काळी कुजल्यासारखी दिसतात. बुरशीची वाढ प्रत्यक्षात फुलांच्या अवस्थेपासून सुरू होते आणि फळांच्या परिपक्वतापूर्वी किंवा त्यापूर्वी दिसून येते. प्रभावित भाग तपकिरी बुरशीच्या वाढीने झाकले जातात. जे स्कॅबच्या जळलेल्या टोकावर राखेसारखे दिसतात. फळांचा आकार असामान्य दिसतो, त्यांच्या पृष्ठभागावर साचा दिसून येतो आणि त्वचेवर जखम स्पष्टपणे दिसतात.



**रोगाचे जैविक नियंत्रण :** या रोगास कारणीभूत असलेल्या बुरशीच्या नियंत्रणासाठी बेकिंग सोडावर आधारित फवारणी केली जाऊ शकते. ही फवारणी करण्यासाठी, ५० ग्रॅम बेकिंग सोडा पाण्यात विरघळवून २५ मिली द्रव साबण प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार केले जाते. संसर्ग टाळण्यासाठी, हे मिश्रण संक्रमित फांद्या आणि जवळच्या फांद्यावर फवारावे. हे केळीच्या बोटांच्या पृष्ठभागाची पीएच पातळी वाढवते आणि बुरशीच्या वाढीस प्रतिबंध करते.

**रासायनिक नियंत्रण :** शक्य असल्यास जैविक उपचारासह प्रतिबंधात्मक उपायांसह एकात्मिक दृष्टिकोनाचा नेहमी विचार करा. हा रोग सहसा किरकोळ महत्त्वाचा असतो आणि क्वचितच रासायनिक नियंत्रणाची आवश्यकता असते. मात्र गेल्या तीन वर्षात या आजाराच्या तीव्रतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे कारण अतिवृष्टीमुळे वातावरणात भरपूर ओलावा निर्माण झाला आहे, जो या आजाराच्या प्रसारासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे रासायनिक नियंत्रणासाठी केळीच्या बाधित घडावर एकदा मॅन्कोझेब, ट्रायओफेनेट मिथाइल किंवा मेटालॅक्सिल १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि नंतर प्लास्टिकने झाकून टाकावे. कॉपर ऑक्सिक्लोराईड स्प्रे सारखी कॉपर बुरशीनाशके देखील प्रभावी ठरू शकतात. परंतु फवारणीच्या १० दिवसांनंतरच फळांची काढणी करावी.

---

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९१६ : पाटणा उच्च न्यायालयाची स्थापना
१९२० : कोलकाता येथे महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारविरुद्ध असहकार आंदोलन सुरू केले.
१९३९ : दुसरे महायुद्ध जर्मनीने पोलंडमधील डांझिग शहर ताब्यात घेतले.
१९४५ : व्हिएतनामने (जपान व फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य घोषित केले.
१९४६ : भारतात अंतरिम सरकारची स्थापना झाली.
१९५८ : हेंड्रिक वरवोर्ड हे दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान म्हणून निवडून आले.
१९६० : केंद्रीय तिबेटी प्रशासनाची पहिली निवडणूक झाली.
१९७० : स्वामी विवेकानंद यांच्या स्मारकाचे उद्घाटन करण्यात आले.
१९७० : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने आपले अपोलो हे चंद्र मिशन काही कारणास्तव रद्द केले.
१९८७ : फिलिप्स कंपनीने पहिल्यांदाच बाजारात आणले.
१९९९ : भारतीय जलतरणपटू बुला चौधरी ही इंग्लिश खाडी दोनदा पोहणारी आशियातील पहिली महिला ठरली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३८ : भारतीय गुरु आणि तत्वज्ञ भक्तिविनाडो ठाकूर यांचा जन्म. (मृत्यू: २३ जुन १९१४)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन रसायनशास्त्रज्ञ विल्हेल्म ऑस्टवाल्ड यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९५६)
१८७७ : फ्रेडरिक सॉडी नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २२ सप्टेंबर १९५६)
१८८५ : भारतीय समाजसुधारक, पत्रकार आणि श्री नारायण धर्म परिपालणाशी संबंधित क्रांतिकारक टी. के. माधवन यांचा जन्मदिन.
१८८६ : प्रा. श्रीपाद महादेव तथा श्री. म. माटे साहित्यिक, विचारवंत व अस्पृश्यता निवारणासाठी सतत प्रयत्न करणारे कृतिशील समाजसुधारक. १९१६ मध्ये त्यांनी दलितांसाठी रात्रशाळा काढली व वीस पंचवीस वर्षे मोफत शिकवले. (मृत्यू: २५ डिसेंबर १९५७)
१९२४ : केनिया देशाचे राष्ट्राध्यक्ष डॅनियेल अराप मोई यांचा जन्म.
१९३२ : स्नॅपल चे संस्थापक अर्नोल्ड ग्रीनबर्ग यांचा जन्म. (मृत्यू: २६ ऑक्टोबर २०१२)
१९४१ : साधना शिवदासानी ऊर्फ 'साधना' चित्रपट अभिनेत्री
१९५२ : जिमी कॉनर्स अमेरिकन लॉन टेनिस खेळाडू
१९५३ : अहमदशाह मसूद अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री (मृत्यू: ९ सप्टेंबर २००१)
१९६५ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक पार्थो सेन गुप्ता यांचा जन्म.
१९७१ : भारतीय अभिनेते आणि राजकारणी पवन कल्याण यांचा जन्म.
१९८८ : भारतीय क्रिकेट खेळाडू इशांत शर्मा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

४२१ : कॉन्स्टान्शियस तिसरा (रोमन सम्राट, जन्म: ?).
१३९७ : फ्रांसेस्को लांडिनी (इटालियन संगीतकार, जन्म: १३२५).
१५४० : इथियोपियाचा सम्राट दावित (दुसरा) यांचे निधन.
१८२० : ज्यांगकिंग (चिनी सम्राट, जन्म: १३ नोव्हेंबर १७६०).
१८६५ : आयरिश गणितज्ञ विल्यम रोवन हॅमिल्टन यांचे निधन.
१९२१ : अँथोनी फ्रांसिस लुकास (अमेरिकन उद्योगपती, जन्म: ९ सप्टेंबर १८५५).
१९३७ : आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती चे स्थापक पियरे डी कौर्तिन यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १८६३)
१९४७ : प्रसिद्ध भारतीय विद्वान, साहित्यकार व शिक्षणतज्ञ तसचं, अलाहाबाद आणि बनारस हिंदू विद्यापीठाचे माजी कुलगुरू अमरनाथ झा यांचे निधन.
१९६० : डॉ. शंकर पुरुषोत्तम आघारकर वनस्पतीतज्ञ, 'विज्ञानवर्धिनी महाराष्ट्र' या संस्थेचे संचालक, त्यांनी पुणे व मुंबई येथील सर्व स्थावर मालमत्ता संस्थेस देणगी दिली. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रविज्ञा विभागातर्फे मिळणाऱ्या प्रतिवार्षिक अनुदानावर संस्थेचा खर्च चालतो. (जन्म:)
१९६४ : फ्रांसिस्को क्रॅव्हेरो लोपेस (पोर्तुगालचे वे१३ राष्ट्राध्यक्ष, जन्म: १२ एप्रिल १८९४).
१९६९ : हो ची मिन्ह व्हिएतनामचे राष्ट्रपती (जन्म: १९ मे १८९०)
१९७६ : गणेश आत्माराम तथा विष्णू सखाराम तथा 'वि. स.' खांडेकर मराठी लेखक, कादंबरीकार, लघुनिबंधकार व समीक्षक, १९४१ मध्ये सोलापूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, पद्मभूषण (१९६८), साहित्य अकादमी फेलोशिप विजेते (१९७०), त्यांनी 'कुमार' या टोपणनावाने कविता लेखन तर 'आदर्श' या टोपणनावाने विनोदी लेखनही केले आहे. त्यांच्या 'ययाति' या कादंबरीसाठी त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार (१९७४) मिळाला आहे. (जन्म: १९ जानेवारी १८९८)
१९७८ : फ्रेड जी. मायर (अमेरिकन उद्योगपती, जन्म: २१ फेब्रुवारी १८८६).
१९९० : नरहर शेषराव पोहनेरकर निबंध, लघुकथा, कादंबरी, कविता आदी साहित्यप्रकार हाताळणारे लेखक आणि 'मराठवाड्याचा चालताबोलता इतिहास' (जन्म: ३ आक्टोबर १९०७)
१९९६ : पॅडी क्लिफ्ट (झिम्बाब्वेचे क्रिकेट खेळाडू, जन्म: १२ जुलै १९५३).
१९९९ : डी. डी. रेगे विलक्षण बोलक्या आणि जिवंत व्यक्तिचित्रणाच्या अत्यंत दुर्मिळ हातोटीमुळे अनेक नामवंतांकडून सन्मानित झालेले चित्रकार व लेखक, लोकसभा व विधानसभेतील अनेक राष्ट्रपुरुषांची चित्रे त्यांनी काढलेली आहेत. (जन्म: १७ डिसेंबर १९११ पाचल, राजापूर, रत्नागिरी)
२००९ : आंध्र प्रदेशचे १४ वे मुख्यमंत्री वाय. एस. राजशेखर रेड्डी यांचे विमान अपघातात निधन (जन्म: ८ जुलै १९४९)
२००१ : विश्वातील पहिले कृत्रिम हृदय प्रत्यारोपण करणारे दक्षिण आफ्रिकेतील महान हृदय विशेषज्ञ व सर्जन क्रिस्टियन बर्नार्ड यांचे निधन.
२०११ : रीनिवास विनायक खळे तथा 'खळे काका' संगीतकार, पद्मभूषण (२०१०) (जन्म: ३० एप्रिल १९२६)
२०१४ : भारतीय वकील आणि राजकारणी गोपाल निमाजी वाहनवती यांचे निधन. (जन्म: ७ मे १९४९)
२०१७ : शिरीष पै कवयित्री, लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या. शिरीष पै यांचे 'एक तारी', 'एका पावसाळ्यात', 'गायवाट', 'कस्तुरी', 'ऋतुचक्र' असे अनेक कवितासंग्रह वाचकांनी डोक्यावर घेतले आहेत. 'लाल बैरागीण', 'हेही दिवस जातील' या कादंबऱ्यांचे लेखनही शिरीष पै यांनी केले आहे.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
बुधवार दि.०२ सप्टेंबर २०२६





# गुत्तेदाराच्या आत्महत्या प्रकरणाला गंभीर वळण ११ जणांवर गुन्हा दाखल!

## पैशांच्या व्यवहारातून कथित त्रास; आत्महत्येपूर्वी डायरीत लिहिली आरोपींची नावे

उदगीर । प्रतिनिधी

पैशांच्या व्यवहारातून वारंवार होत असलेल्या कथित त्रासाला कंटाळून वायगाव येथील ५० वर्षीय गुत्तेदाराने गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या प्रकरणाला आता गंभीर वळण मिळाले आहे. आत्महत्येपूर्वी संबंधित व्यक्तींनी त्रास दिल्याचे सांगत त्यांची नावे डायरीत लिहून ठेवल्याचे समोर आले असून, याप्रकरणी ११ जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

दयानंद बाबूराव हुल्ले (वय ५०, रा. वायगाव, ता. उदगीर, ह.मु. लातूर) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्यांचा मुलगा आदित्य हुल्ले यांनी याबाबत पोलिसांत फिर्याद दिली आहे.तालुक्यातील वायगाव येथे ५० वर्षीय गुत्तेदार दयानंद हुल्ले यांनी राहत्या घरातील खोलीच्या स्लॅबच्या कडीला दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास घडली होती. पोलिसांच्या माहितीनुसार, दयानंद हुल्ले यांनी काही व्यक्तींना पैसे दिले होते. हे पैसे परत मिळावेत म्हणून त्यांनी संबंधितांकडे वारंवार मागणी केली. मात्र, पैसे परत न करता संबंधितांनी त्यांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्रास दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या त्रासाला कंटाळून २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास वायगाव येथील राहत्या घरी त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली.



दयानंद हुल्ले यांनी आत्महत्येपूर्वी कथित त्रास देणाऱ्या व्यक्तींची नावे डायरीत लिहून ठेवल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यामुळे सुरुवातीला अकस्मात मृत्यू म्हणून नोंद झालेल्या या प्रकरणाला आता गुन्ह्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

३१ ऑगस्ट रोजी फिर्यादीने पोलिस ठाण्यात हजर राहून जबाब दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी आसीफ काझी, किरण पायाळ, निखिल जांभळे, लोंढे सर, घनश्याम मोरे, मीना सर, विनय जाकते, हरिभाऊ भगत, गणेश हॉटेलचे मालक, केंद्रे इंजिनियर आणि रहिम भाई अशा ११ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक डी. डी. गाडे यांच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक बेंबडे करीत आहेत. या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासाअंती स्पष्ट होणार आहे.

**आत्महत्येपूर्वी डायरीत नावे...**

दयानंद हुल्ले यांनी आत्महत्येपूर्वी कथित त्रास देणाऱ्या व्यक्तींची नावे डायरीत लिहून ठेवल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यामुळे सुरुवातीला अकस्मात मृत्यू म्हणून नोंद झालेल्या या प्रकरणाला आता गुन्ह्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. ३१ ऑगस्ट रोजी फिर्यादीने पोलिस ठाण्यात हजर राहून जबाब दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी आसीफ काझी, किरण पायाळ, निखिल जांभळे, लोंढे सर, घनश्याम मोरे, मीना सर, विनय जाकते, हरिभाऊ भगत, गणेश हॉटेलचे मालक, केंद्रे इंजिनियर आणि रहिम भाई अशा ११ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विद्यार्थिनींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म पासून दूर राहून ध्येयावर लक्ष केंद्रित करावे ! पीएसआय रेवती भोसले

पाथर्डी । प्रतिनिधी

श्री तिलोक जैन विद्यालयामध्ये विद्यार्थिनींसाठी पाथर्डी पोलीस स्टेशनच्या पोलीस उपनिरीक्षक तथा दामिनी पथकाच्या प्रमुख रेवती भोसले यांच्या मार्गदर्शनपर संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले पीएसआय रेवती भोसले यांनी विद्यार्थिनींशी मनमोकळा संवाद साधत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म सायबर क्राईम टवाळखोर मुलांपासून सावध राहणे सोशल मीडियाचा योग्य वापर मोबाईलचा वाढता अतिरेक सध्याचे सामाजिक वातावरण मुलींची सुरक्षितता या विविध विषयांवर मार्गदर्शन केले बदलत्या काळात मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर अपरिहार्य झाला असला तरी त्याचा अतिरेक विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर आणि भविष्यातील ध्येयावर परिणाम करू शकतो त्यामुळे विद्यार्थिनींनी मोबाईलचा आवश्यक तेवढाच वापर करून शिक्षण व्यक्तिमत्त्व विकास आणि आपल्या भविष्यातील ध्येयावर लक्ष केंद्रित करावे सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क टाळणे असे आवाहन केले यावेळी रेवती भोसले यांनी स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाचा प्रवास व अनुभव विद्यार्थिनींसोबत शेअर करत अभ्यास करताना आलेल्या अडचणी सातत्य मेहनत वेळेचे नियोजन आणि ध्येय निश्चित करून त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते असे त्यांनी विद्यार्थिनींना सांगितले या वयात स्वतःला योग्य प्रकारे सांभाळून अभ्यास केला आणि चुकीच्या गोष्टींपासून दूर राहिले तर प्रत्येक मुलीचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते असा प्रेरणादायी संदेश रेवती भोसले यांनी दिला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी होते यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

# खरवंडी जुनी पेठ सेंट्रल बँक स्थलांतर करण्याची मागणी

पाथर्डी । प्रतिनिधी

खरवंडी कासार येथील जुन्या पेठेतील सेंट्रल बँक बीड अहिल्यानगर मुख्य महामार्ग व नव्या पेठेतील लोकनेते गोपीनाथ मुंडेनगर भागात स्थलांतरित करण्याची मागणी खरवंडी कासार व परिसरातील दहा ते बारा गावातील बँक ग्राहकांनी व्यापारी व शेतकऱ्यांनी केली आहे खरवंडी कासार सेंट्रल बँकेतील अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे बँकेचे कामकाज पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होत आहेत यामुळे खरवंडी कासार येथे अजून पर्यायी राष्ट्रीयकृत बँकेची मागणी जोर धरू लागली आहे खरवंडी कासार सेंट्रल बँकेच्या समोर अनधिकृत सेतू केंद्रांना परवानगी देऊन गरीब ग्राहकांची व शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केली जाते एवढेच नाही तर खरवंडीत राष्ट्रीयकृत बँक उपलब्ध नसल्याने अनधिकृत पतसंस्था यांच्याकडून शेतकऱ्यांची व ग्राहकांची आर्थिक पिळवणूक केली जाते खरवंडी कासार येथील सेंट्रल बँक पेठेत असल्याने अरुंद रस्त्यात वाहनांची ये जा होत नाही तसेच सेंट्रल बँक ज्या इमारतीत आहे ती धोकेदायक बनली असून तिथे श्वास घेता येत नाही ऑक्सिजनची कमतरता आहे अनेक वेळा साप विंचू असे कीटक निघून बँक ग्राहकांच्या जीवाशी धोका निर्माण होत आहे या सर्व कारणामुळे पेठेतील सेंट्रल बँक लोकनेते गोपीनाथ मुंडे चौकात स्थलांतरित करण्यात यावी अशी मागणी बँक ग्राहकाकडून करण्यात येत आहे.




# लातूर जिल्ह्यात हेल्मेट सक्ती : राष्ट्रीय, राज्य महामार्गांवर विनाहेल्मेट दुचाकीस्वारांवर कारवाई

**लातूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील वाढते रस्ते अपघात आणि त्यातील जीवितहानी कमी करण्यासाठी लातूर पोलिसांनी १ सप्टेंबरपासून हेल्मेट सक्तीची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्गांवर विनाहेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांनी कारवाईची वाट न पाहता आजपासूनच हेल्मेट वापरण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

मार्च २०२६ पासून लातूर जिल्हा पोलीस दलाकडून रस्ते अपघात रोखण्यासाठी आणि जीवितहानी कमी करण्यासाठी विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. केवळ दंडात्मक कारवाई करण्याऐवजी नागरिकांमध्ये रस्ते सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यावर पोलिसांनी भर दिला.

जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या ठिकाणी अपघातग्रस्त वाहने ठेवून त्यांची झालेली अवस्था नागरिकांना दाखविण्यात आली. अपघातामुळे वाहनांचे होणारे नुकसान, मानवी जीवितावर होणारा परिणाम आणि कुटुंबांवर ओढवणारे संकट याची जाणीव करून देण्यात आली. 'अपघात झाल्यानंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा अपघात टाळण्यासाठी हेल्मेट वापरा', असा संदेश या माध्यमातून देण्यात आला. अपघातात कुटुंबातील व्यक्ती गमावलेल्या नातेवाइकांचे अनुभवही व्हिडिओच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आले. तसेच हेल्मेट वापरल्यामुळे अपघातातून बचावलेल्या व्यक्तींचे अनुभवही प्रसारित करण्यात आले. 'हेल्मेटमुळे जीव वाचला' हा प्रत्यक्ष अनुभव नागरिकांना हेल्मेट वापरण्यासाठी प्रेरणादायी ठरला. उन्हाळ्यात रक्तदात्यांची संख्या कमी होत असल्याने अपघातातील गंभीर जखमींना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, यासाठी लातूर पोलीस दलाने पोलीस अधीक्षक कार्यालयासह विविध पोलीस ठाण्यांच्या स्तरावर रक्तदान शिबिरे घेतली. या शिबिरांमध्ये तब्बल ३२०० नागरिकांनी रक्तदान केले. विशेष म्हणजे रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याला हेल्मेट देण्यात आले. रक्तदानातून एका व्यक्तीचा जीव वाचविण्याचा प्रयत्न आणि हेल्मेटच्या माध्यमातून भविष्यातील अपघातात जीव वाचविण्याचा संदेश पोलिसांनी दिला.

दरम्यान, नागरिकांना हेल्मेट सहज उपलब्ध व्हावे यासाठी लातूर पोलीस सहकारी पथसंस्थेच्या माध्यमातून १४०४ हेल्मेटचे वाटप करण्यात आले आहे.

पोलिसांनाही हेल्मेट सक्ती

हेल्मेट वापराबाबत पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना स्पष्ट निर्देश दिले आहेत. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या पोलिसांनी सुरुवात स्वतःपासून करावी, या भूमिकेतून पोलीस अधिकारी किंवा अंमलदार विनाहेल्मेट दुचाकी चालविताना आढळल्यास त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.यापूर्वीही विविध पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून विनाहेल्मेट दुचाकी चालविणाऱ्यांसह विनासिटबेल्ट चारचाकी चालविणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

# मंठा तालुक्यात 'शिक्षण परिषद' उत्साहात संपन्न

## गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांना मार्गदर्शन; लोकसहभाग व अध्ययन निष्पत्तीवर भर

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील समूह साधन केंद्र, विडोळी यांच्या वतीने व पी.एम.श्री. केंद्रीय प्राथमिक शाळा, विडोळी यांच्या आयोजनातून गटशिक्षणाधिकारी श्री दत्तात्रय क्षीरसागर व शिक्षण विस्तार अधिकारी श्री के.जी.राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली १ सप्टेंबर, २०२६ रोजी समूह साधन केंद्र समन्वयक महेशकुमार चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण परिषद उत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी केंद्रीय मुख्याध्यापक श्री मुपडे, श्री डी.ए.चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

परिषदेची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. श्री. चव्हाण डी. ए. यांनी मागील शिक्षण परिषदेचा आढावा घेतला. त्यानंतर आणापान साधना-विपश्यना या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.




शिक्षण परिषदेत अध्ययन निष्पत्तीच्या आधारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे नियोजन कसे करावे याबाबत श्री. संजयकुमार ठाकूर यांनी मार्गदर्शन केले. गणित-विज्ञान विषयातील विद्यार्थ्यांची जिज्ञासा व वैज्ञानिक दृष्टिकोन कसा विकसित करावा याबाबत श्रीमती आयोध्या झोल यांनी विचार मांडले. तर लोकसहभागातून शाळेच्या विकासाला गती कशी देता येईल याबाबत श्री. गंगाधर वानोळे यांनी शिक्षकांना सविस्तर मार्गदर्शन मिळाले.

प्रशासकीय बाबींवर मार्गदर्शन करीत शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी विशेष परिश्रम घ्यावेत असे आवाहन श्री चौधरी यांनी अध्यक्षीय भाषणात केले.शिक्षण परिषदेत शिक्षकांनी आपल्या शाळांमध्ये राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती व अनुभवांची देवाणघेवाण केली तसेच शिक्षकांना शैक्षणिक नियोजन, नाविन्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थीकेंद्रित अध्यापन आणि शाळाविकासासाठी लोकसहभाग याबाबत प्रेरणा मिळाली. 'ज्ञानांची देवाणघेवाण, अनुभवांची सांगड आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास' या भावनेतून झालेली ही शिक्षण परिषद शिक्षकांसाठी मार्गदर्शक ठरली. श्री विशाल नागरे यांनी सूत्रसंचालन केले तर यशस्वीतेसाठी विडोळी येथील मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# ग्रीन वलांडीच्या माध्यमातून हरित क्रांतीकडे वाटचाल

वलांडी । प्रतिनिधी

देवणी तालुक्यातील वलांडी येथे युवकांनी पुढाकार घेत सुरू केलेल्या 'ग्रीन वलांडी' या पर्यावरणपूरक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, गाव हरित करण्याच्या दिशेने ठोस पाऊल पडत आहे. या उपक्रमांतर्गत मंगळवारी (दि. ११) १०१ व्या वृक्षाचे वृक्षारोपण जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील तळेगावकर यांच्या हस्ते करण्यात आले.

'ग्रीन वलांडी'च्या माध्यमातून केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प युवकांनी केला आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस, घटत चाललेले वृक्षाच्छादन आणि पर्यावरणाचा बिघडता समतोल लक्षात घेता गावागावांत मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड होणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर वलांडीतील युवकांनी सुरू केलेला उपक्रम कौतुकास्पद असून, त्यातून इतर गावांनाही प्रेरणा मिळत आहे.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील तळेगावकर यांनी वृक्षारोपणाबरोबरच



**१०१ व्या वृक्षाचे जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील तळेगावकर यांच्या हस्ते रोपण; वृक्षसंवर्धनासाठी मदतीचे आवाहन**

वृक्षसंवर्धन हीच खरी पर्यावरणसेवा असल्याचे सांगत, लावलेल्या प्रत्येक झाडाची नियमित काळजी घेण्याचे आवाहन केले. गावातील नागरिक, व्यापारी, सामाजिक संस्था, युवक मंडळे आणि लोकप्रतिनिधींनी या उपक्रमात सहभागी होऊन वलांडीला हिरवाईने नटविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी जवळगा जिल्हा परिषद गटाचे सदस्य रामलिंग शेरे, पंचायत समिती सभापती अंकिता सुशांत पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रशांत पाटील जवळगेकर, माजी सरपंच हणमंत बिरादार, युवा नेते सुरज मुळे, बाजार समिती अध्यक्ष उमाकांत नागलगावे, शालेय समिती अध्यक्ष अविनाश गायकवाड, सोपान चन्नावार, सामाजिक कार्यकर्ते अरुण पाटील, सुशांत साबणे, यासिन मुर्शेद, असलम तांबोळी यांच्यासह 'ग्रीन वलांडी' उपक्रमातील युवक व नागरिक उपस्थित होते.

वृक्षारोपणापेक्षा वृक्षसंवर्धन महत्त्वाचे

दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले जाते; मात्र लावलेली झाडे जगविणे ही त्याहून मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे 'एक झाड लावा आणि ते झाड जगवा' हा संदेश घेऊन ग्रीन वलांडीच्या माध्यमातून वृक्षांना पाणी देणे, संरक्षण करणे, नियमित देखभाल करणे आणि त्यांचे संगोपन करण्यावर भर देण्यात येत आहे.

# मंठ्याच्या नवीन बाजार संकुलाचा मार्ग मोकळा

## ठेंगेवडगावची ३.९५ हेक्टर गायरान जमीन बाजार समितीला

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील मंठा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन बाजार संकुलाच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला असून मौजे ठेंगेवडगाव येथील ३ हेक्टर ९५ आर शासकीय गायरान जमीन कृषी उत्पन्न बाजार समिती, मंठा यांना देण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे.

पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधित जमीन बाजार समितीला देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. जिल्हाधिकारी, जालना यांनीही जमीन प्रदान करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार महसूल व वन विभागाने ही जमीन नाममात्र १ रुपया कब्जेहक्काची रक्कम आकारून 'भोगवटादार वर्ग-२' या धारणाधिकाराने बाजार समितीला देण्यास मान्यता दिली आहे. जमिनीचा वापर केवळ नवीन बाजार संकुल विकसित करण्यासाठीच करता येणार आहे. जमीन ताब्यात देण्यापूर्वी तिची मोजणी व हद्द निश्चित करण्यात येणार असून, बाजार संकुलाच्या विकासासाठी आवश्यक त्या सक्षम प्राधिकरणांच्या परवानग्या घेणे बंधनकारक राहणार आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे याबाबत म्हणाले, मंठा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी नवीन बाजार संकुल उभारण्याची आवश्यकता लक्षात घेऊन शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकरी आणि कृषी व्यापाराशी संबंधित पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे हा शासनाचा सातत्याने प्रयत्न आहे. या निर्णयामुळे मंठा परिसरातील कृषी व्यापाराला आवश्यक असलेल्या आधुनिक सुविधांच्या विकासाला गती मिळेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरीहिताच्या आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारे निर्णय शासन घेत आहे.

# आयोगाच्या निकालावर विद्यार्थ्यांच्या शंका; गुणांतील तफावतीची पारदर्शक चौकशी करण्याची कलमुर्गे यांची मागणी

## मेहनत करणाऱ्या उमेदवारांच्या विश्वासाला धक्का लागू नये; सत्य समोर आणण्यासाठी निष्पक्ष तपास आवश्यक

नांदेड । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) गट क मुख्य परीक्षा २०२५ च्या निकालाबाबत माजी सैनिक प्रवर्गातील काही उमेदवारांनी उपस्थित केलेल्या शंका आणि प्रश्नांची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी युवा रोजगार परिषदेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी केली आहे. माजी सैनिक विद्यार्थ्यांनी संपर्क साधून निकाल प्रक्रियेतील काही बाबींबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या शंकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, संबंधित यंत्रणेने उपलब्ध पुरावे, कागदपत्रे आणि गुणांकन प्रक्रियेची पारदर्शकपणे पडताळणी करणे आवश्यक असल्याचे कलमुर्गे यांनी म्हटले आहे.

या प्रकरणात कोणत्याही उमेदवारावर थेट आरोप करणे योग्य नाही. मात्र विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन होणे गरजेचे आहे. पारदर्शक चौकशी झाली तरच सत्य समोर येईल आणि प्रामाणिकपणे मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विश्वास कायम राहील, असे कलमुर्गे म्हणाले. गुणांमधील अचानक वाढीबाबत विद्यार्थ्यांचे प्रश्न

माजी सैनिक विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार काही उमेदवारांच्या मागील परीक्षांतील कामगिरी आणि MPSC Group C मुख्य परीक्षेतील गुणांमध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. याबाबत विद्यार्थ्यांनी पुढील प्रश्न उपस्थित केले आहेत. पूर्वीच्या परीक्षांमध्ये मर्यादित गुण मिळालेल्या उमेदवारांना यावेळी २०० पेक्षा अधिक गुण कसे मिळाले? पहिल्याच प्रयत्नात एवढ्या मोठ्या प्रमाणात गुण मिळण्यामागील कारण काय? मागील परीक्षेतील गुण आणि सध्याच्या निकालातील गुणांमध्ये मोठी वाढ कशी झाली?

निगेटिव्ह मार्किंग असलेल्या परीक्षेत एवढ्या मोठ्या प्रमाणात अचूकता कशी साधली गेली?

विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असलेल्या संवाद आणि कागदपत्रांमधील तफावतींची अधिकृत तपासणी होणार का? स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी अनेक विद्यार्थी अनेक वर्षे संघर्ष करतात. आर्थिक अडचणी, वयाची मर्यादा आणि कुटुंबाच्या अपेक्षांमध्ये ते आपले भविष्य घडवण्यासाठी मेहनत घेत असतात. त्यामुळे निकाल प्रक्रियेबाबत कोणतीही शंका निर्माण झाल्यास ती गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. तसेच चझडउ चे अवर सचिव अभिजित लेंढवे यांच्या कार्यकाळातील विविध भरती प्रक्रियांबाबत काही तक्रारी किंवा शंका असल्यास त्यांचीही स्वतंत्रपणे तथ्याधारित चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

**पुराव्यांची पडताळणी करून अधिकृत तक्रार सादर करणार**

या प्रकरणासंदर्भात उपलब्ध कागदपत्रे, गुणपत्रिका, संवाद आणि इतर पुराव्यांची योग्य पद्धतीने पडताळणी करून आवश्यक असल्यास सक्षम अधिकारी व संबंधित प्राधिकरणाकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात येईल, असे कलमुर्गे यांनी स्पष्ट केले. MPSC ही लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी जोडलेली संस्था आहे. त्यामुळे प्रत्येक भरती प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यामुळे त्यांची उत्तरेही तथ्यांच्या आधारे मिळाली पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
बुधवार दि.०२ सप्टेंबर २०२६ | ६

# पात्रुडच्या महामार्गावरील अतिक्रमणांमुळे अपघातांचा धोका वाढला

## संरक्षक जाळी चोरीलाही प्रशासन जबाबदार? रिपब्लिकन सेनेचे कारवाईचे साकडे

पात्रुड । प्रतिनिधी

माजलगावपासून अवघ्या सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या पात्रुड गावातून जाणाऱ्या शेगाव-पंढरपूर पालखी मार्गावरील राष्ट्रीय महामार्गावर दिवसेंदिवस वाढत असलेली अतिक्रमणे आणि महामार्गाच्या दुभाजकावरील संरक्षक जाळीची चोरी यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महामार्गालगत झालेल्या अतिक्रमणांमुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत असून, वाहनचालकांना अचानक मार्ग बदलावा लागत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे प्रशासनाने आता केवळ अतिक्रमणाकडे दुर्लक्ष न करता नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेचा प्रश्न म्हणून या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहावे अशी मागणी होत आहे.

रिपब्लिकन सेनेचे माजलगाव युवा तालुकाध्यक्ष अन्वर सय्यद यांनी तहसीलदार, माजलगाव यांच्याकडे निवेदन सादर करून पात्रुड येथील राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे तातडीने हटविण्याची तसेच संरक्षक जाळी चोरीप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

पात्रुड गावातून जाणारा हा महामार्ग सतत वर्दळीचा असून या मार्गावरून मोठ्या प्रमाणात दुचाकी, चारचाकी, अवजड वाहने तसेच प्रवासी वाहतूक सुरू असते. मात्र महामार्गाच्या हद्दीतच विविध प्रकारची अतिक्रमणे वाढत असल्याने रस्त्यालगतचा सुरक्षित परिसर कमी होत आहे. काही ठिकाणी अतिक्रमित जागा भाडेतत्त्वावर देऊन आर्थिक वसुली केली जात असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे.

रस्त्यालगत अतिक्रमण वाढल्याने



वाहनचालकांना सुरक्षित अंतर राखणे, वळण घेताना दृष्यमानता मिळणे आणि पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणे यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी अतिक्रमणे, वाहनांची गर्दी आणि अपुऱ्या सुरक्षाव्यवस्थेमुळे परिस्थिती अधिक धोकादायक बनत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या महामार्गावरील खराब रस्त्या मुळे होत असलेल्या

अपघातांची मालिका रोखण्यासाठी प्रशासनाने जागे व्हावे

महामार्गावरील अपघात ही केवळ वाहतूक व्यवस्थेची समस्या नसून ती थेट नागरिकांच्या जीविताशी संबंधित बाब आहे. एखाद्या कुटुंबातील व्यक्ती महामार्गावरील अपघातात जखमी झाली किंवा जीव गमावला तर त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. त्यामुळे अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा अपघात होण्यापूर्वीच धोकादायक ठिकाणे शोधून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय करणे गरजेचे आहे.

पात्रुड परिसरातील अतिक्रमणांमुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने एखाद्या मोठ्या अपघाताची वाट न पाहता महामार्गाची तातडीने पाहणी करून धोकादायक अतिक्रमणे हटवावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

संरक्षक जाळी चोरीमुळे सुरक्षेचा प्रश्न

महामार्गाच्या दुभाजकावर वाहनांच्या सुरक्षिततेसाठी बसविण्यात आलेली संरक्षक जाळी अज्ञात व्यक्तींनी चोरी केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. ही जाळी केवळ लोखंडी साहित्य नसून महामार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेशी संबंधित व्यवस्था आहे. तिची चोरी होऊनही संबंधित यंत्रणेने तातडीने दखल घेतली नाही तर भविष्यात त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. संरक्षक जाळी नेमकी कधी चोरीला गेली, कोणत्या भागातून चोरी झाली, याबाबत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच चोरी झालेल्या ठिकाणी तातडीने नवीन संरक्षक जाळी बसवून महामार्गावरील सुरक्षा व्यवस्था पूर्ववत करावी, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने केली आहे. या प्रकरणी प्रशासनाने पंधरा दिवसांच्या आत ठोस कारवाई करावी, अन्यथा रिपब्लिकन सेनेच्या वतीने ◀◀ पान ३ वर

# शेतकऱ्यांच्या सुविधांसाठी बाजार समित्यांचा विकास गरजेचा -आमदार प्रकाश सोळंके

## माजलगाव बाजार समितीमध्ये शेतकरी भवन व रस्ता कामाचे भूमिपूजन

माजलगाव । प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समित्या या शेतकऱ्यांच्या हिताचे केंद्र असून, शेतमालाच्या विक्रीसोबतच शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही बाजार समित्यांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन आमदार प्रकाश सोळंके यांनी केले.

माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन तसेच मुख्य प्रवेशद्वार ते सुचेंद्र ट्रेडिंग कंपनी पर्यंत काँक्रेट रस्ता कामाचे भूमिपूजन



आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, माजी सभापती संभाजी शेजुळ, माजी समाजकल्याण सभापती कल्याणराव अबुज,माजी पं. स.उपसभापती डॉ.वसीम मनसबदार, लोकनेते सुंदरराव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वीरेंद्र सोळंके,माजी उपसभापती निळकंठराव भोसले,वडवणी बाजार समितीचे सभापती संभाजी शिंदे,संचालक कॉ.दत्ता डाके,खरेदी विक्री संघाचे चेअरमन जमीर भाई,सभापती जयदत्त नरवडे, श्रीहरी मोरे, हरिभाऊ सवणे यांची उपस्थिती होती.पुढे बोलताना आमदार सोळंके म्हणाले की, शेतकरी ◀◀ पान ३ वर

# कापूस आणि तुरीच्या शेतातून सव्वादोन लाखांचा गांजा जप्त

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील राजपिंप्री शिवारात कापूस आणि तुरीच्या पिकात आंतरपीक म्हणून बेकायदेशीरपणे लावलेली गांजाची १३० झाडे पोलिसांनी छापा टाकून जप्त केली. या कारवाईत तब्बल २ लाख २० हजार रुपये किमतीचा १० किलो गांजा हस्तगत करण्यात आला असून, ७५ वर्षीय शेतमालकाविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६:३० वाजेच्या सुमारास राजपिंप्री शिवारातील शेत गट क्रमांक ३१ मध्ये छापा टाकला. या वेळी शेतमालक भाऊसाहेब काशिनाथ केदार (वय ७५) याने कापूस व तुरीच्या सऱ्यांमध्ये लपवून लावलेली फुले व



बिया असलेली छोटी-मोठी १३० गांजाची झाडे आढळून आली.

पोलिसांनी तत्काळ सर्व झाडे उपटून सुमारे १० किलो वजनाचा गांजा जप्त केला असून, शेतमालकावर गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अण्णासाहेब रोकडे करत आहेत.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन उपअधीक्षक भारत पांढरे, पोलीस निरीक्षक किशोर पवार, सहायक पोलीस निरीक्षक समाधान दौंड, पोलीस उपनिरीक्षक अण्णासाहेब रोकडे, सहायक फौजदार राजू भिसे, नितीन शिंदे तसेच अंमलदार विशाल कांबळे, कल्याण राठोड, रवींद्र राऊत, सुंदर राठोड, रामराजे काकडे, अक्षय लोढे, योगेश निर्धार, राजेंद्र सांगळे आणि राजेंद्र चोरमले यांच्या पथकाने पार पाडली.

# एलसीबीची मोठी कारवाई: ऑनलाईन जुगार अड्ड्यासह अवैध वाळू उपशावर छापे, ६ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त

बीड /अंबाजोगाई । प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध धंद्यांवर वचक निर्माण करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम राबवत दोन स्वतंत्र कारवायांमध्ये तब्बल ६ लाख १ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अंबाजोगाई तालुक्यातील सायगाव येथे सुरू असलेल्या 'बिंगो' ऑनलाईन जुगार अड्ड्यावर छापा टाकून ६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला, तर माजलगाव ग्रामीण हद्दीत गोदावरी पात्रातून अवैध



वाळू उपसा करणारे ट्रॅक्टर जप्त करण्यात आले.

सायगाव शिवारात पत्र्याच्या शेडमध्ये ऑनलाईन जुगार; ६ जणांवर गुन्हा

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अंबाजोगाई व माजलगाव उपविभागात गस्त घालत असताना बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे सायगाव शिवारात, अंबाजोगाई ते लातूर रोडवरील एका पत्र्याच्या शेडमध्ये बेकायदेशीररित्या 'बिंगो' नावाचा ऑनलाईन जुगार सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली.

माहितीच्या आधारे पोलिसांनी अचानक छापा टाकला असता, आरोपी डएऊटीव्ही स्क्रीन, उझण, की-बोर्ड, माऊस आणि स्पीकरच्या साहाय्याने पैशांवर ऑनलाईन जुगार खेळत व खेळवत असल्याचे रंगेहात आढळून आले. फय्यीम समी खतीब (वय ३०, अड्डा मालक)

फैय्याज खान कौसर खान पठाण (वय ३२) सय्यद फतात सय्यद निजामोद्दीन (वय ३५) सय्यद समीर सय्यद ◀◀ पान ३ वर

# पावसा अभावी शेतकऱ्यांची पीकं उध्वस्त तत्काळ कृत्रिम पाऊस पाडा : राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

पावसाअभावी शेतकऱ्यांची पिक उध्वस्त झाली असून शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन करपून चालली आहे. कापूस पिकाचं वाटोळ होण्या अगोदर सरकारने, शासन प्रशासनाने तत्काळ कृत्रिम पावसाचा प्रयोग करावा तर शेतकरी वाचेल अन्यथा पावसाअभावी शेतकऱ्यांचं वाटोळं होईल असे शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देताना शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे म्हणाले.



शेतकऱ्यांनी शेतातात बी-बियाणे, खते या वर लाखो रुपये खर्च केला आहे. अनेक शेतकऱ्यांनी दुबार पेरणी करून शेतात कापूस सोयाबीन तूर पीक घेतली आहेत. पावसा अभावी शेतकऱ्यांच्या पिकाचं अतोनात नुकसान झाले असून सरकारने उपाय योजना केली नाही तर शेतकरी देशोधडीला लागले या करिता सरकारने तत्काळ कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयोग करण्यात यावा अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अडीच हजार नवीन पथदिवे बसवावेत

## बीड न.प.च्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सवासह सणांच्या पार्श्वभूमीवर बीड शहरात नगरपरिषदेने तातडीने २५०० नवीन पथदिवे खरेदी करावेत आणि गणेशोत्सव मंडळे असलेल्या प्रमुख मार्गांवर व चौकांमध्ये हे पथदिवे तातडीने बसवून ते कार्यान्वित करावेत, अशी मागणी भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांच्याकडे मंगळवारी (दि.१) केली आहे.

मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, बीड शहराचा विस्तार झपाट्याने होत



असून सध्या अनेक प्रमुख रस्ते व कॉलनी भागातील स्ट्रीट लाईट बंद अवस्थेत आहेत. यामुळे नागरिकांना व विशेषतः रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. शहरात ज्या खांबांवर दिवे बंद आहेत ते त्वरित सुरू करणे आणि ज्या ठिकाणी अद्याप दिवेच नाहीत, अशा ठिकाणी सुमारे ५ हजार नवीन पथदिव्यांची गरज आहे. लवकरच गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार असून पाठोपाठ दसरा, दिवाळी आणि हिवाळा ऋतू सुरू होत आहे. या काळात ◀◀ पान ३ वर

### गणेशोत्सवापूर्वी रोड क्रॉसिंग करा

गणेशोत्सवाच्या काळात विविध गणेश मंडळांच्या परिसरात नागरिकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे मुख्य रस्त्यांवर व आवश्यक ठिकाणी रोड क्रॉसिंगची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी करण्यात आली. यामुळे नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतुकीचे नियोजन सुलभ होण्यास मदत होणार आहे.

# माजलगाव धरणाची उंची वाढवण्यास २२ पुनर्वसित गावांतील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव धरणाची उंची वाढवण्याच्या प्रस्तावाला १९७९ मध्ये पुनर्वसित झालेल्या २२ गावांतील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असून, धरणाची उंची वाढवण्यापूर्वी शासनाने पुनर्वसित शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण करावे, अशी मागणी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

इरला, डुब्बा, तेलगाव, पुंगणी, एकदरा, रामपिंपळगाव, फुलेपिंपळगाव, मंगरूळ, सावरगाव, शेलापुरी, रेनापुरी, देवखेडा, नागझरी, ढोरगाव, लऊळ, परडी, माटेगाव, देवगाव, काडीवडगाव, खळवट, लिमगाव, कवडगाव आदी गावांतील



नागरिकांनी धरणाच्या निर्मितीच्या काळात आपली घरे, शेती व गाव सोडून पुनर्वसन स्वीकारले. अनेक कुटुंबांनी नव्या ठिकाणी पुन्हा संसार उभा केला.आता पुन्हा धरणाची उंची वाढवून पुनर्वसित शेतकऱ्यांच्या जमिनी, घरे किंवा उपजीविकेवर परिणाम होणार असेल, तर हा अन्याय कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असा इशारा युवा शेतकरी संघर्ष समितीने दिला आहे.धरणाची उंची वाढवण्यापूर्वी शासनाने २२ पुनर्वसित गावांचा संपूर्ण सर्वेक्षण अहवाल, वाढीव बुडीत क्षेत्राचा नकाशा, बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या, भूसंपादन प्रक्रिया, नुकसानभरपाई आणि पुनर्वसनाचे धोरण स्पष्टपणे

### युवा शेतकरी संघर्ष समिती शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा उभारणार

जाहीर करावे. तसेच संबंधित शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे.

एकदा पुनर्वसनाचा त्रास सहन केलेल्या शेतकऱ्यांवर पुन्हा विस्थापन लादण्याचा प्रयत्न झाला, तर युवा शेतकरी संघर्ष समिती २२ पुनर्वसित गावांतील शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन उभारेल. शेतकऱ्यांच्या हक्कांची किंमत मोजून कोणताही विकास आम्हाला मान्य नाही, असा स्पष्ट इशारा समितीच्या वतीने देण्यात आला. ◀◀ पान ३ वर

# बिंदुसरा काठावरील रस्त्याचे काम श्रेय वादात अडकले

## पावसाळ्यात रस्त्यावर पाण्याचे डोह वाहतुकीसाठी रस्ता कुचकामी, रस्त्यावरच कचऱ्याचे ढीग, परिसरात दुर्गंधी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बिंदुसरा काठावरील सुभाष रोड आणि मोंढा रोड यांना जोडणारा हा रस्ता श्रेयवादामध्ये अडकला आहे. या रस्त्याचे खडीकरण आणि डांबरीकरण न झाल्याने या रस्त्यावर पावसाळ्यात मोठमोठे डोह साचलेले असतात. त्यामुळे हा रस्ता कुचकामी ठरतो. याच रस्त्यावर कचऱ्याचे मोठे मोठे ढीग पडलेले असतात. हा कचरा जाळल्याने परिसरात धुराचे लोट चालू असतात. ओल्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून परिसरातील नागरिक रोगराईने त्रस्त असतात. हा रस्ता लवकर व्हावा अशी परिसरातील नागरिकांच्या अपेक्षा आहे.

बिंदुसरा नदीचा काठ अतिक्रमणाच्या विळख्यात सापडला असून या ठिकाणी सुभाष रोड आणि मोंढा रोड यांना जोडणारा एक समांतर रस्ता करण्यात आलेला आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी काटेरी झाडे आणि कचऱ्याचे ढीग पडलेले आहेत. हा रस्ता बऱ्याच दिवसापासून पडलेला असल्याने या ठिकाणी मोठमोठे खड्डे पडून त्या ठिकाणी पावसाळ्यात




पाणी साचलेले असते. त्यामुळे कुठलेही वाहन या रस्त्यावरून जाणे दुरापास्त होते आणि कोणी प्रयत्न केला तरी त्याचे कपडे रंगीबेरंगी होतात. त्यामुळे सहसा या रस्त्याने जाण्याच्या भानगडीत कोणी पडत नाही. याचवेळी मोंढा रस्त्याच्या कॉर्नरला अनाधिकृत वाहन तळ झाले असून या ठिकाणी ट्रक, टेम्पो, ट्रॅक्टर छोटे टेम्पो उभे केले जातात. या परिसरामध्ये काही ठिकाणी कोणाचे लक्षण नसल्याने जुगारही चालतात तर काही तळीराम या परिसरात असलेल्या झाडाखाली




बसून मनसोक्त दारू ढोसतात. हा रस्ता खडीकरण आणि डांबरीकरण न झाल्याने वाहतुकीसाठी कुचकामी ठरतो या रस्त्यावरून सहसा कोणी जातच नाही. हा रस्ता म्हणजे असून अडचण आणि नसून खोळंबा अशी परिस्थिती आहे. या परिसराकडे नगरपालिकेचे दुर्लक्ष होत असून कचरा या ठिकाणी न टाकता बाहेर टाकावा यासाठी कोणीही रोखठोक करत नाही. त्यामुळे परिसरातील नागरिक ही याच ठिकाणी कचरा टाकतात. त्यामुळे ◀◀ पान ३ वर

### तळीरामांचाही वावर

या परिसरामध्ये रस्ता वाहतूक योग्य नसल्याने या परिसरामध्ये झाडाखाली बसून तळीरामही यथायोग्य दारू ढोसतात आणि याच ठिकाणी धिंगाणा घालतात त्यामुळे मंदिराकडे जाणाऱ्या महिलांना याचा त्रास होतो.

### पावसाळ्यात पाण्याचे डोह

या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने पावसाळ्यामध्ये पाहण्याचे डोह साचतात त्यामुळे या रस्त्यावरून जाणे केवळ अशक्य होते .त्यामुळे हा पर्याय मार्ग असून अडचण अन नसून खोळंबा असा झाला आहे. याचे खडीकरण आणि डांबरीकरण झाले तर हा रस्ता वाहतुकीसाठी योग्य होईल.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26